ग्रंथाली वाचक चळवळीचे

# रुची

डिसेंबर २००९ • मूल्य १० रुपये

## दिनकर गांगल यांना वाल्मीकी पुरस्कार



निर्मला सामंत-प्रभावळकर यांच्या हस्ते स्वीकारताना दिनकर गांगल



## 'फुलाला सुगंध मातीचा' पुस्तकाचे प्रकाशन




वीणा देव, मृणाल कुलकर्णी, डॉ. अनिल काकोडकर, डॉ. स्नेहलता देशमुख, ॲड. उज्ज्वल निकम, ज्योती निकम, नितीन तेंडुलकर, सुयशा काकोडकर आणि श्रेया घोषाल

लेखिका



डॉ. अंजली कुलकर्णी



डॉ. अनुराधा [illegible]

## ‘वन फॉर सॉरो’ पुस्तकाचे प्रकाशन



मधु मंगेश कर्णिक, अनुराधा गोरे, सुहास चित्रे, लेखिका अनुराधा कुलकर्णी

## ‘एक दिवस जीवनातला’ पुस्तकाचे प्रकाशन



मृणाल कुलकर्णी, लेखिका नीला सत्यनारायण, मोहन धारिया, सुरेश प्रभु, दिनकर गांगल, वीरेंद्र चित्राव व अन्य

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# रुची

**डिसेंबर २००९**
**वर्ष २९ वे, अंक १२ वा, मूल्य १० रु.**

संपादक : **दिनकर गांगल**
या अंकाचे संपादन : **धनंजय गांगल**

मुखपृष्ठ : **ग्रंथाली संगणक विभाग**

**रुची – वार्षिक वर्गणी : १०० रुपये**

**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, महापालिका शाळेची इमारत, पहिला मजला, टोपीवाला लेन, डॉ. भडकमकर रोड पोलिस ठाण्यासमोर, ग्रँटरोड, मुंबई ४०० ००७
☎ २३८९ २४ ४५ ● फॅक्स : २३८७ ५४ ८१
ग्रंथाली, इंडियन एज्युकेशन सोसायटीची म. फुले कन्याशाळा, बाबरेकर मार्ग, दादर, मुंबई ४०० ०२८ ☎ २४४७ ४८ ४३
Email - granthali01@gmail.com

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

स. न.

१९७३ च्या ऑगस्ट महिन्यात स्टॉकहोम शहरातील बँकेत, बँक लुटण्याच्या उद्देशाने काही सशस्त्र लुटारू शिरले. त्यांच्या दुर्दैवाने, लूट पूर्ण होण्याच्या आधीच बँकेला पोलिसांचा वेढा पडला. यात लुटारूंनी काही बँक कर्मचाऱ्यांना ओलिस ठेवले. सहा दिवस या कर्मचाऱ्यांना मृत्यूच्या दारात काढावे लागले. आश्चर्य म्हणजे, सुटका झाल्यानंतर हे कर्मचारी आपल्या जिवावर उठलेल्या लुटारूंबद्दल सहानुभूतीने बोलू लागले आणि काही तर चक्क भलामण करू लागले! वरवर विचित्र वाटणाऱ्या या मानसिक प्रवृत्तीचे विश्लेषण करणाऱ्या नील्स बेजॉट या मानसशास्त्रज्ञाने या प्रवृत्तीला नाव दिले 'स्टॉकहोम सिंड्रोम'! पुढे अनेक वेळा दहशतवाद्यांनी ओलिस ठेवून मग सुटका झालेल्या अनेकांच्या बाबतीत या सिंड्रोमचा प्रत्यय आला.

दुखरी दाढ परत परत दाबून येणाऱ्या कळांत मिळणाऱ्या सुखात जी भावना असते तशीच जवळपास या सिंड्रोममध्ये असते. केवळ भावनेच्या पातळीवर जगणाऱ्या मूठभर लोकांसाठी हे ठीक आहे; पण जेव्हा एक मोठा मानवसमूहच असा पराभव आणि दुःख कुरवाळण्यात रममाण होतो आणि तेच 'सेलिब्रेट' करू पाहतो तेव्हा त्याला कुठला सिंड्रोम म्हणायचा? त्याला नक्कीच '२६/११ सिंड्रोम' म्हणावे लागले!

१९९३ च्या मुंबईतील बॉम्बस्फोट साखळीनंतर तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी दूरदृष्टीने मशीदबंदर येथील एक कल्पित बॉम्बस्फोट आपल्या निवेदनात वाढवला. संभाव्य दंगल टाळण्याच्या दृष्टीने ते योग्यच होते. जवळपास त्याच दृष्टीने २६/११च्या हल्ल्यात स्थानिक सहभाग अजिबात नव्हता असे सांगण्यात आले. पुन्हा एकदा दंगलीचा संभाव्य धोका टाळण्याकरता ते योग्यच होते; पण प्रश्नाच्या मुळाशी जायचे नाही, कोणाला दुखावायचे नाही, सतत 'पॉलिटिकली करेक्ट' राहायचे असा एक नवीन विचार रुढ होऊ पाहत आहे. त्यातही भर म्हणून या सगळ्यापाठी मोसाद आणि हिंदुत्वादी संघटनांचा हात असल्याचे चित्र निर्माण करून गोंधळ अजून वाढवावा, अशी काही जणांची मानसिक गरज आहे. पण हा आवाज अजून तरी क्षीण आहे. एकूणच दहशतवादी हल्ले ही 'नैसर्गिक आपती' असण्याचे नवीन तत्त्वज्ञान रुढ होऊ पाहत आहे. बाय इम्लिकेशन, ते आपण टाळू शकत नाही, त्याला विरोध करू शकत नाही, मोडून काढू शकत नाही. जास्तीत जास्त आपला बचाव करणे एवढेच शिल्लक राहते. झालेच तर मेणबत्या लावून, वेगवेगळे इव्हेंट करून त्या कटू आठवणींना उजाळा देत दुःख साजरे करावे!

अशा कृतिशून्य भावनिक वातावरणात शहिदांविषयी कौतुकाने उमाळे सोडून काहीही बोलणे म्हणजे देशद्रोहच. तेथे घडलेल्या घटनांचा वस्तुनिष्ठ आढावा घ्यायचे पाप कोण कशाला करेल? रात गयी बात गयी अशी सगळी स्थिती. हा गोंधळ कमी म्हणून की काय महाराष्ट्राच्या ज्या तत्कालीन गृहमंत्र्यांना 'इंडिया'च्या रोषाला बळी पडून राजीनामा द्यावा लागला त्यांनाच 'भारता'ने भरघोस मतांनी निवडून परत गृहमंत्री केले आणि काव्यगत न्याय मिळवला.

'डिक्लाईन अँड फॉल ऑफ रोमन एम्पायर' या पुस्तकात एडवर्ड गिब्सनने अशाच कृतिशून्य, जाणिवा हरवलेल्या, भावनिक पातळीवर जगणाऱ्या रोमन राज्याचे वर्णन केले आहे. अर्थात अशा दुर्बळ अवस्थेतही ते राज्य जवळ १०० वर्ष टिकले कारण कोणी हल्लाच केला नाही! आपल्यालाही तेवढी संधी मिळेल अशी आशा करुया.

**– संपादक**

# दिनकर गांगल 'वाल्मीकी पुरस्कारा'ने सन्मानित

**प्रतिनिधी**



दिनकर गांगल यांचा सत्कार करताना निर्मला सामंत-प्रभावळकर आणि न्यासाचे पदाधिकारी

श्री सिद्धिविनायक मंदिर न्यासातर्फे गेल्या दिवाळीत विविध क्षेत्रांत आपल्या कार्याने ठसा उमटवणाऱ्या मान्यवरांचा विविध पुरस्कार देऊन गौरव करण्यात आली. यावेळी 'ग्रंथाली'चे संस्थापक-सदस्य दिनकर गांगल यांना 'वाल्मीकी पुरस्कार' देऊन त्यांचा सन्मान केला. त्यावेळी दिनकर गांगल यांच्या कार्याचा आढावा घेताना विनोद पवार म्हणाले- ''ग्रंथमोहोळ, ग्रंथएल्गार, बालझुंबड, बहुजन साहित्य, विपुल ग्रंथयात्रा अशा महाराष्ट्र पिंजणाऱ्या यात्रा... माधव चितळे, अण्णा हजारे, मेधा पाटकर, बा.भ. बोरकर, आशा भोसले, शरद पवार, देशमुख, शिंदे आदींचं प्रकटन...दुर्गाबाई-कमला सोहोनी, विजय तेंडुलकर अशांशी संवाद...सत्तेचे मोहरे, सिंहासन, उपरा, बलुतं अशी पाचशेहून अधिक पुस्तकं... सारं काही खुलं, सर्वांसाठी...काय आणि किती उल्लेख करायचे!

गेली पस्तीस वर्षं मराठी मुलुखात विविधांगांनी ज्ञानाभिसरण करत राहिली ती ग्रंथाली...समाजाच्या हृदयात सामावली...वाचक चळवळ म्हणून. या चळवळीचा आधारवड म्हणजे दिनकर गांगल. एक संस्थापक-सदस्य. सामाजिक-सांस्कृतिक मूल्यांना वाहिलेल्या या चळवळीनं गांगलांच्या संपादनात पुस्तक प्रकाशन क्षेत्रातही वेगळा ठसा उमटवला. हस्तलिखित हाती आल्यावर, आशयाचं अंतरंग जाणून लेखकाच्या मांडणीवर आणि विचारप्रक्रियेवर संस्कार करतो तो संपादक. महाराष्ट्रातल्या अशा दिग्गज संपादकांतील ठळक नाव म्हणजे दिनकर गांगल. त्यांची ओळख याहीपुढे जाणारी आहे. एखाद्याशी बोलताना, त्या व्यक्तीकडून सामाजिक-सांस्कृतिक महत्त्वाचा विषय मांडला जात असेल, तर तो मुळात लेखक असो-नसो, त्याला लिहितं करून, पाठपुरावा करून, न कातावता त्याच्याकडून एखादा लेख वा पुस्तक लिहवून घेणं ही गांगलांकडे असलेली दुर्मिळ हातोटी आहे. एखाद्याच्या ऊर्मी जागवणं आणि त्या घडवणं हा त्यांचा स्थायीभाव. त्यांनी किती पुस्तकं निर्माण केली, त्यापेक्षा अव्यक्तांना व्यक्त होण्याचं व्यासपीठ निर्माण केलं आणि ज्ञानाभिसरणाचं साधन या दृष्टीनं पुस्तकांची निर्मिती केली.

केसरी, महाराष्ट्र टाइम्स या वृत्तपत्रांत पत्रकार म्हणून कारकीर्द सुरू करताना मटाचे पुरवणी संपादक म्हणून त्यांनी नवे विषय, नवे लेखक पुढे आणले. वृत्तपत्रीय पुरवणीला वेगळा चेहरा दिला. त्याच काळात पत्रकारितेच्या विशेष अभ्यासासाठी फेलोशिप मिळून ते लंडनला गेले.

गुणांची पारख आणि नाविन्याबद्दल औत्सुक्य यांमुळे कोणत्याही वयोगटाशी, कोणत्याही स्तरातील व्यक्तीशी सहज संवाद साधू शकण्याची उपजत कला असलेलं हे दिलखुलास व्यक्तित्व.

छापील शब्दांचा प्रभाव आणि मर्यादा यांची स्पष्ट जाण असलेल्या गांगलांचं, दृकश्राव्य माध्यमातही तेवढंच महत्त्वाचं कार्य आहे. संस्थापक-सदस्य म्हणून प्रभात चित्र मंडळाच्या माध्यमातून ते अधोरेखित झालं आहे.

आज, वयाच्या सत्तरीतही त्यांच्याकडून आगळा प्रकल्प साकारेल आणि आपण विस्मयानं त्याला नकळत दाद देऊ.''

दिनकर गांगल यांचा सत्कार ही ग्रंथाली परिवारास आनंददायी घटना आहे. त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन.

# 'मराठी मानसिकता आणि मराठी संस्कृती'

## अनामिकाचे टिपण

मराठी मानसिकता आणि मराठी संस्कृति या विषयावर चर्चा करण्यासाठी सध्याचा काळ फारसा अनुरूप नाही. फार तर, मनन-चिंतन होऊ शकेल फलदायी चर्चा होईल याची खात्री देता येत नाही. आजची मराठी मानसिकता आणि संस्कृती-धारणा ज्या व्यक्तींचे भाषासौष्ठव 'आय-माय-व्यायली' याच्या पलिकडे जात नाही अशांच्या वक्तृत्वावर व लाथा-बुक्क्यांच्या आदान-प्रदानावर घडते आहे. सध्या मुद्यांच्या ऐवजी गुद्यांची चलती आहे. मराठी संस्कृति म्हणून जे काही आजपर्यंत आपण मिळवलं आहे ते सारे धुळीला मिळण्याचा हा काळ आहे. अशा परिस्थितीत चिंतन व मनन करण्यापलीकडे दुसरा पर्याय रहात नाही. तेव्हा तो पर्याय धुंडाळण्याचा हा एक सैल व स्वैर प्रयत्न.

मराठी हा शब्द विशेषणात्मक की संज्ञात्मक इथून खल व्हायला हवा. मराठी-मानसिकता आणि मराठी-संस्कृति या शब्दांकडे जोड-शब्द अथवा समास म्हणून पाहिले तर होणारा उलगडा साक्षात्कारी ठरण्याचा संभव आहे. ह्या शब्दांची फोन मध्यम पदलोपी पद्धतीने केली तर त्यांचा अर्थ मराठी माणिकांची मानसिकता व मराठी भाषिकांची संस्कृति असा होईल. उपरोक्त विषयाचे मनन करण्यासाठी मराठी भाषेची सध्याची अवस्था, ती भाषा बोलणाऱ्या लोकांची मानसिकता व संस्कृती काय आहे या संबंधी विचार करावा लागेल तसेच तो विचार मराठी ज्यांची मातृभाषा आहे व जे महाराष्ट्रात रहातात त्यांच्यापुरता मर्यादित ठेवावा लागेल.

मानसिकता हा व्यक्तीच्या संदर्भात तपासावयाचा विषय आहे. संस्कृति हा समुदायाचा संदर्भात. मानसिकता ही तात्कालिक आहे असे गृहित धरले तर ती बदलू शकते असा त्याचा अर्थ होतो. काहीही कारणास्तव ती जर बदलू शकत नसेल तर ती खोलवर रुजली आहे असा त्याचा अर्थ होतो. ती मानसिकता संस्कृतीचा भाग बनते. एकूण नादभेदीची विचारसरणी, नकारात्मक विचारपद्धती, सत्याला नाकारण्याची सवय, कचखाऊ वर्तन व जबाबदारीशून्य थिल्लर राजकारण अशा मानसिकतेमुळे संस्कृतीची अस्ताच्या दिशेने वाटचाल अटळ आहे. ह्याला भाषेचा ऱ्हास व राजकारणी मंडळींचे नैतिक अधःपतन जोडा की संस्कृतीची विल्हेवाट फार दूर नाही असे समजावे. गरीब बिचार मराठी जनता आपल्या परीने आणि परक्यांच्या मदतीने मार्ग काढीत राहील.

भाषा आणि संस्कृती या दोहोंचा अन्योन्य संबंध आहे, परंतु संस्कृती शब्दामध्ये इतर अनेक गोष्टी समाविष्ट आहेत. अलिकडील काही संस्कृतीकारणी (राजकारणी या धर्तीवर) संस्कृतिचा अर्थ वाङ्मयापुरता मर्यादित ठेवतात. काहीना आपल्या धर्मरुढी, परंपरा, इतिहासातील अतिरंजित दाखले जे कुणीच पडताळून पाहू शकत नाही- याचा संस्कृतीशी थेट संबंध जोडतात तर डावीकडचे राजकारणी पिळणाऱ्या वर्गाकडील पिळवणुकीचे एक हत्यार असा संस्कृतीचा अर्थ लावतात. स्वातंत्र्योत्तर काळातील काँग्रेससारख्या पक्षाना, निदान राज्यस्तरावर- संस्कृती, भाषा याच्याशी काही देणे-घेणे आहे असे बिलकुल वाटत नाही. लोकसत्तामधील त्रिकालवेध या निबंधमालेमध्ये भाषा संस्कृती या विषयाची मूलभूत आणि विविध अंगी मांडणी केली आहे. हे प्रश्न इतके गहन आहेत की ही अंतःचक्षु उघडणारी ही ज्ञानप्रसारक मालिका अविरत चालू रहावी, असे वाटते.

भाषा हे संस्कृतीचे अधिष्टान आहे. वि. का. राजवाडे यांच्या मांडणीप्रमाणे भाषा हे त्या भाषिक गटाच्या विकार-विचार प्रदर्शनाचे प्रमुख साधन आहे. त्या अनुषंगाने त्यांनी केलेले संस्कृतीचे म्हणजेच समाजाच्या विकार-विचार प्रदर्शनाच्या साधनांचे विवेचन सर्वकष आहे. त्या साधनांच्या ऐतिहासिक विकासाचे व सध्याच्या काळात आढळणारी त्या साधनांची स्थिती यांचे अवलोकन केले तर मराठी मानसिकता व मराठी संस्कृती यांचे विदारक सद्यःस्वरुप आपल्या डोळ्यासमोर उभे रहाण्यास मदत होईल. तसे अवलोकन वस्तुनिष्ठ तर असेलच पण कालसापेक्षही असेल. कालसापेक्ष यासाठी म्हटले की भविष्यात या साधनांची, पर्यायाने मराठी भाषेची व संस्कृतीची काय अवस्था होणार आहे याचा वेध घेता येईल.

भाषेचा इमला चार मूळतत्वांवर उभा आहे. ध्वनि(आवाज), रेखाटण(रेषा), हावभाव(अनुकरण) व त्रिमितीची जाणीव ही ती मूळ तत्वे. ध्वनीची विकसित स्थित्यंतरे (व्याकरणबद्ध शब्दांची) भाषा, स्वरज्ञान व काव्य अशी आहेत. रेखाटनाचा विकास अक्षरकला व चित्रकला असा आहे. हावभाव-जाणीवेचा विकास नृत्य, नाटक असा आहे. तर त्रिमिती जाणीवेचा विकास भांडीकुंडी, मूर्तिकला, स्थापत्य व आधुनिक विज्ञान जगतात अवकाश- प्रवास असा आहे. या विकासक्रमात विज्ञान-तंत्रज्ञानाची

जोड मिळून अधिक समिश्र कलांचा उदय होऊ शकतो- उदाहरणार्थ चित्रपटकला, की-बोर्ड, आधुनिक ध्वनिलेखन व पुनःप्रक्षेपण इत्यादी. अशा रितीने भाषेसह इतर आंतरिक व बहिर्गत सामग्रीने विकार-विचार प्रदर्शनाची साधने निर्माण झाली आहेत व होत आहेत. त्यात मराठी माणसांचे स्थान काय व मराठीचे राजकीय पुढारी मंडळींचे त्यात योगदान काय याचा विचार व्हावयास हवा. मराठी भाषिक असण्याचा व शास्त्रीय संगीत वा नृत्यकला वा अभिनय वा चित्रकला यात पारंगत असण्याचा काहीही संबंध नाही. विविध क्षेत्रात नाव कमावलेले मराठी कलावंत मराठी असल्यामुळे मोठे झालेले नाहीत तर ते स्वकष्टाने, पुष्कळदा बिगर मराठी गुरू कडून विद्या शिकून मोठे झाले आहेत. आपल्या विकार-विचारांच्या कलात्मक, प्रदर्शना-बाबत आतुर असल्यामुळे मोठे झालेले आहेत. विज्ञान क्षेत्रात अनेक मराठी व्यक्ती आहेत पण आंतरराष्ट्रीय पातळीवर नावाजलेले कमी व नोबेलपारितोषिक विजेता तर एकही मराठी नाही. खरे तर सर्व कलाप्रकार प्रादेशिक व राष्ट्रीय पातळी ओलांकडून वैश्विक पातळी गाठण्याच्या दिशेने चालले आहेत. क्रीडा क्षेत्रात हुतुतु व खोखो सोडले तर मराठी खेळ नाहीत. सचिन उत्तम क्रिकेट खेळतो याचा त्याचा मराठी असण्याशी काडीचाही संबंध नाही. नृत्यामध्ये भाषेचा संबंध नाही. संबंध आहे तो पदलालित्याचा व स्वर-तालाचा. मराठीच्या संदर्भात बोलायचे तर वैश्विक नृत्यकलेपुढे तमाशाची जुन्या परंपरांवर आधारित असलेली नृत्यकला केव्हाही फिकी पडणार. सुदैवाने मराठी चित्रपटसृष्टी त्या सापळ्यातून बाहेर पडत आहे पण गेली कित्येक वर्षे ती टुकार आणि पाचकळ विनोदात खितपत पडली होती हे आपण जाणतोच. तर अशा कलेच्या रुपात मराठीपणा व मराठी संस्कृती कशी शोधावी? आपल्या वहिनीबाईंचा वावर हिंदी चित्रपटातच असतो आणि साहेबांचे मित्र हिंदी तलशात विहरतात हेही आपणास माहीत आहे.

एकंदर कलाविष्कारांमध्ये मराठी असण्याचा व मराठी संस्कृतिचा काडीचाही संबंध नाही हे पुनःपुन्हा नमूद करावेसे वाटते. संबंध आहे तो संस्कृत असण्याचा, कलाविषयात समरस होण्याचा व कला-साधनांमध्ये पारंगत होण्याचा भारतातील विविध भाषिक (आणि प्रादेशिक- कुमार गंधर्व देवासचे होते) गटांनी (हवे तर घराण्यी म्हणा किंवा आचार्य कुळांनी म्हणा) आपापली कलासाधना जागती ठेवली- नवीन पिढ्यांकडे सोपवीत ठेवली ही आश्चर्याची व सुखाची बाब आहे. आश्चर्याची अशा करिता म्हटले की राजकीय पुढाऱ्यांचे व शासनाचे पाठबळ नसताना सुद्धा! आपले बहुतेक राजकीय पुढारी हे संस्कृतीकारधात बव्हंशी उदासीन व गावंढळ आहेत. त्यांना स्वतःच्या व स्वतःच्या जातकुळीतील सग्यासोयऱ्यांच्या भल्यापलिकडे, व्यक्तिगत सत्तेपुढे आणि संपत्तीपुढे दुसरे काहीही दिसत नाही; कुवत नाही असे म्हणवणार नाही पण इच्छा नाही असे जरूर म्हणेन.

मराठी अस्मितेचा जो सर्वोच्च बिंदू म्हणजे शिवाजी- तेव्हांपासून ते आजतागायत संयुक्त महाराष्ट्र होऊन जवळ जवळ साठ वर्षे उलटून गेली तिथ पर्यंत जगाचे आकर्षण ठरेल अशी एखादी वास्तू, शिल्प आपण उभे केले आहे काय? स्वातंत्र्य सैनिकांच्या नावाने गावोगावी उभारलेल्या स्मारकांची बुरसटलेली व शेवाळलेली अवस्था पाहू नये अशीच आहे. ब्रिटीशांनी निदान व्हिक्टोरिया टर्मिनस तरी बांधले. आपण मात्र त्यावर आयत्या बिळावर नागोबा बनून शिवाजीचे नाव चिकटवले. शिवाजीच्या अष्टप्रधानात आठ मंत्री की तेरा मंत्री होते यावर वाद घालून शिवाजी बसवू पाहत असलेल्या सर्व समावेशक मराठी 'पातशाही'च्या मूळ उद्दिष्टांना आपण विसरलो.

राहता राहिला प्रश्न वाङ्मयाचा आणि त्या वाङ्मयाच्या अविष्करणाचे एक्मेव साधन असलेल्या मराठी भाषेचा. आजची मराठी भाषा ही वैदिक, संस्कृत, प्राकृतिक आदि भाषांची संकरित अपत्य आहे. काळाच्या आणि वाङ्मय निर्मितीच्या ओघात तिला अनेक भाषिक उपगटांचा, जातींचा, वर्णांचा हातभार मिळालेला आहे. बोली आणि शाब्दिक लकबी हळूहळू नामशेष होऊन मराठी वाङ्मयनिर्मिती अखेरचे आचके देऊ लागले असे मला वाटते. याचा अर्थ ती संवादाची व व्यवहाराची भाषा म्हणून लगेच नामशेष होईल असे नाही. वस्तुस्थिती अशी आहे की आजची मराठी ही वेगाने पाठ्यपुस्तकाळात आहे तशीच शासनाळते आहे. पानागणिक आणि नियमागणिक मराठीचा राजरोस खून पडतो आहे. हा ऱ्हासाचा क्रम आपण उलटा फिरवू शकणार नाही. केवळ मराठीचीच नव्हे तर भारतातील बहुतेक भाषांची कमीअधिक प्रमाणात तशीच अवस्था असावी. प्रश्न मराठी भाषेत शपथ घेऊन सुटणारा नाही. शपथेचा मजकूर मी वाचलेला नाही त्यामुळे त्यातील मराठी भाषेचा वकुब कसा आहे ते सांगू शकणार नाही. तसेच त्या शपथेमध्ये 'मी सभागृहाचा मान राखीन, राडा करणार नाही, लाच खाणार नाही, टक्का मागणार नाही, जमीन घशात घालणार नाही, समाजसेवा करीन, गुन्ह्याला हमेशा शासन होते की नाही हे पाहीन, सामाजिक प्रश्नांचा अभ्यास करून ते सुटतील कसे हे पाहीन, त्यासाठी विद्वज्जनांचा सल्ला घेईन, धर्म-जात यांवर आधारित भेदभाव करणार नाही, राज्याच्या हिताचा विचार देशाच्या हिताइतकाच महत्त्वाचा आहे वगैरे विचार त्या शपथेत आहेत की नाही हे मला ठाऊक नाही. तेव्हा शपथ घेऊन प्रश्न सुटत नाहीत, तर शपथेप्रमाणे आचरण केले तर प्रश्न सुटायची शक्यता अधिक. भाषेचा प्रश्न अधिक खोलात जाऊन पाहू. पुन्हा एकदा वि. का राजवाडे यांना विस्ताराने उद्धृत करतो ते म्हणतात.

''मनुष्याजातीच्या मुखातून जे जे म्हणून सार्थ व संपूर्ण विधान शब्दरुपाने भूत, वर्तमान व भविष्यकाली बाहेर पडले, पडते

व पडेल ते ते सर्व वाङ्मय होय. वाङ्मयाचे दोन प्रकार... ऐहिक व पारलौकिक. ऐहिक म्हणजे इहलोकातील खटाटोपाशी ज्याचा अनन्यसंबंध ते पारलौकिक म्हणजे परलोकातील विषयांशी ज्याचा अनन्य संबंध आहे ते....ऐहिक वाङ्मयाचे तीन प्रकार. ज्ञानवर्धक, व्यवहारवर्धक व प्रसारक. आंतर व बाह्य सृष्टीचा शोध ज्या वाङ्मयाने प्रकाशित व प्रदर्शित होतो त्या वाङ्मयाला ज्ञानवर्धक उर्फ शास्त्रीय वाङ्मय म्हणतात. कलांचे प्रकाशन व प्रदर्शन ज्या वाङ्मयाने सिद्ध होते ते व्यवहारवर्धक वाङ्मय. प्रसारक वाङ्मय म्हणजे समाजातील लहानमोठ्या, बालवयस्क व्यक्तींना शास्त्रज्ञानाने व कलाज्ञानाचे बालबोध, मनोरंजक व मूलतत्वात्मक ज्ञान ज्याच्या द्वारे होते ते. यात जी उच्च दर्जाची काव्ये, नाटके, कादंबऱ्या, पदे, निबंध, नीतिप्रबंध असतात त्यास विदग्ध उर्फ सारस्वत हे नामाभिधान आहे...''

इथे वर्णिलेल्या वाङ्मय प्रकारांत मराठी सध्या कोठे आहे? अगदी अलिकडे अलिकडेपर्यंत आघाडीवर असलेल्या मराठी विदग्ध वाङ्मयाला असीम ओहोटी लागल्याचे जाणवते. इतर वाङ्यत प्रकारात ज्याला शैक्षणिक वाङ्मय म्हणावे त्याचा तर पूर्ण बोजवारा उडाला आहे. आपली शालेय पाठ्यपुस्तके पाहिली तर मी असे का म्हणतो ते ध्यान्यात येईल. उच्चशिक्षणाचे मराठी हे माध्यम नाहीच नाही व तसे ते होऊ शकत नाही. जे काही विद्यापीठात मराठीतून शिकवले जातात त्यातले मराठी त्या त्या लेखकाना व प्रपाठकाना अनुशेषाने व अनुमानाने कळत असेल तेव्हढेच. मराठीतून लिहिलेला अर्थशास्त्रातील प्रबंध वा इतिहासाचे टिपण तोंडदेखले सुद्धा वाचवत नाही. याचे मुख्य कारण म्हणजे सध्याचा राष्ट्रीय एकीकरणाचा व जागतिकीकरणाचा रेटा व विज्ञान-कला यांचे बदलणारे वैश्विक रुप हे आहे. आजच्या तंत्रज्ञानाच्या वैश्विक युगात केवळ मराठीच नव्हे तर जगातील सर्वच भाषा (जर्मल व फ्रेंच सुद्धा- इंग्रजान विचाराल तर इंग्रजीसुद्धा) नामोहरम होत आहेत. युरोपिअन युनियन ने इंग्रजीचा अधिकृत भाषा म्हणून स्वीकार केला आहे. त्यामुळे फ्रेंच, जर्मन, स्पानिश, स्लाविक आदि सर्वच भाषा आपल्या भाषेची नासाडी करणार ही भीती इंग्रंजाना आहे. गंमतीचा भाग हा की इंग्रजी भाषा बोलणारा ग्रेट ब्रिटन (इंग्लंड) हा त्या युरोपिअन युनियनचा सभासद देखील नाही. चिन्यांनी, जपानी लोकांनी रोमन लिपी स्वीकारली आहे. सगळे जगच असे इंग्रजाळत चालले असताना आपण आपली भाषा उराशी कवटाळून घेऊन बसण्यात काय हंशील आहे? अशा स्थितीत ना भाषेचा दुराभिमान बाळगता येत, ना ज्या पुढाऱ्यांची मुले इंग्रजी माध्यमात शिकतात त्यांना दोष देता येत. पण मराठीचा निरुपयोगी अभिमान बाळगणाऱ्यांनी जनाची नाही तरी मनाची लाज धरावी. भोळ्या-भाबड्या जनतेनेही जागे होऊन आपल्या पुढाऱ्यांना अवघड प्रश्न थेट विचारून वठणीवर आणावयास हवे. जगाची भाषा मराठी असावी व लिपी देवनागरी असावी असे स्वप्न तर आपण पाहू शकत नाही. तसे स्वप्न पहाणे खुळचटपणाचे होईल. सध्याच्या विपर्यस्त वास्तवात इंटरनेट, ट्विटर, एसेमेस यांच्या घबाडात (गर्भात) नवीन वैश्विक भाषा जन्माला येत आहे आणि तिची लिपी रोमन अक्षरे असणार आहे. त्या भाषेतील वाङ्मय कसे निपजेल ते सांगता येत नाही. राजवाडे ज्याला पारलौकिक वाङ्मय म्हणतात ते मात्र स्वभाषेत म्हणजे मातृभाषेत फोफावेल. येणाऱ्या काळात आपल्या देशात बहुतेकांच्या अंगवळणी पडलेली त्रिभाषासूत्री सर्व जगभर लागू होईल असे वाटते. त्रिभाषा सूत्री म्हणजे ज्याची त्याची मातृभाषा, इंग्रजी ही वैश्विक भाषा व एक परकीय भाषा (आपण जिथे रहात असू तिथल्या बहुसंख्य लोकांची मातृभाषा मुंबईसारखा शहरात कुणाचीही कॉलर पकडा, त्याला किंवा तिला तीन भाषा येतात याचा पडताळा येईल.)

अशा परिस्थितीत आपण मराठी माणसे दोन गोष्टी करू शकतो. एक म्हणजे बदलते वास्तव लक्षात घेऊन मराठी माणसाने मिळेल त्या साधनांनी (कुठच्याही भाषेसकट) कलोपासना चालू ठेवली पाहिजे व दुसरी गोष्ट म्हणजे आपली मराठी एक पुरातन भाषा म्हणून जपून ठेवली पाहिजे. ( एखाद्या नष्टप्राय वन्य पशूजातीला संरक्षण द्यावे तसे). त्यासाठी मराठी विदग्ध वाङ्मयाची तरुण पिढीला ओळख होईल, तिच्या वारशाचा त्यांना अभिमान वाटेल, तो वारसा जतन करायला ते उद्युक्त होतील असे वर्तन मराठी माणसांनी विशेषतः त्यांच्या पुढाऱ्यांनी करावयास हवे. मराठी पुढाऱ्यांनी मराठी भाषेचा दुराभिमान सोडून, सर्वसमावेशक पद्धतीने समाजापुढील प्रश्न तडीस नेले पाहिजेत. आपल्या प्रभावा-खालील क्षेत्रामध्ये कलेची जोपासना होईल असे वातावरण निर्माण केले पाहिजे. कला व वाङ्मय क्षेत्रात गुंतवणूक केली पाहिजे. दुर्दैवाने मराठी प्रांतात यशवंतराव चव्हाणांनतर वाङ्मयाचे व संस्कृतिचे भान असणारा दुसरा पुढारी झाला नाही. काहीचे मग ते मराठा असोत वा इतर जातीचे (सीकेपी धरून) सारे संस्कृतीच्या नावोन शून्यवत वाटतात. बहुतेकांच्या सुसंस्कृतपणा फेटा बांधण्यापलिकडे किंवा कपाळी लाल टिळा लावण्यापलिकडे गेला आहे असे वाटत नाही. समाजजीवन व समाजातील सामंजस्य उंचावण्याचे सर्व मार्ग आपण शोधायला हवेत व त्यासाठी लागणारा सुसंस्कृतपणा व विचारीपणा अंगी बाणवायला हवा. मराठी नाही तरी मराठी माणसाची संस्कृती व मान तसे केले तर उंच होईल यात शंका नाही.

(आधार-लेख वि. का. राजवाडे यांचे - ''विकार-विचार प्रदर्शनाच्या साधनांची उत्क्रांती'', ''प्राकृतिक भाषांचा व वाङ्मयाचा इतिहास'' आणि ''मराठ्यांचा इतिहास कसा लिहावा?'')

टीप : या टिपणातील निरिक्षणे व मते व्यक्तिशः अनामिक वाचकाची आहेत.

# रिॲलिटी शोंमागची रिॲलिटी

## संजीवनी खेर

आठवा ते दूरदर्शनचे सुरुवातीचे दिवस. सरकारी कार्यक्रम ते मनोरंजनाचे कार्यक्रम असा जो प्रवास झाला त्यात कितीतरी जनोपयोगी कार्यक्रम दाखवले जात असत. रुकावट के लिए खेद है म्हणत म्हणत आज रुकावटच एक कार्यक्रम होत चालला आहे. कारण रुकावट म्हणजे एक विश्रांती! हा शब्द कमर्शियल ब्रेकसाठी समर्पक नाही तरी वापरला जातोय. ही बाब खेद करण्याजोगी नव्हे तर तुमचा कार्यक्रम किती लोकप्रिय आहे याची निदर्शक झालेली आहे. त्यामुळे बऱ्याचदा जाहिराती नि दुसऱ्या कार्यक्रमांच्या माहितीच्या गदारोळात आपण कोणता कार्यक्रम पाहत होतो हेच लक्षात राहत नाही अशी अवस्था झालीय. टीआरपीनामक लोकप्रियतामापक साऱ्यांचे भवितव्य ठरते. काही काळापूर्वी रिलॅलिटी शोंनी किती सुंदर दालन खुले केले देशातील भाषिक गुणवत्ता शोधायचे! सर्व भाषांमधील गुणवंतांना स्टार डस्ट लागू लागली. आदिवासी भागातील मुलेमुलीही शहरी मुलांच्या बरोबरीने आपले कर्तृत्व दाखवू लागली. गाणी, विनोद, नृत्य अशा कितीतरी कलांतील; अन्यथा प्रसिद्धीपासून दूर राहणाऱ्यांना एक व्यासपीठ मिळाले. जवळजवळ सर्वच भाषांतील अशा कार्यक्रमांना प्रचंड लोकप्रियता मिळत होती. पण चॅनल्सची भूक वाढतच गेली. काहीही करून टीआरपी मिळवण्याचे उद्योग सुरू झाले. त्याचेच प्रताप आपल्याला पाहायला मिळत आहेत. रिॲलिटी शोच्या नावाने जो गोंधळ घातला जात आहे त्याला ताळतंत्र नाही असे वाटू लागले आहे म्हणूनच ह्या लेखाचा प्रपंच!!

या घटकेला एक अश्लील विनोद आठवतोय. एक तरुण कामानिमित्त दुसऱ्या गावी जातो. रात्री एका हॉटेलवर राहतो. तिथे आपल्या मनोरंजनासाठी कुणी येईल का असे विचारतो. तशी व्यवस्था होते. आनंदाने दुसऱ्या दिवशी तो घरी परततो. मित्राला सांगतो की त्या हॉटेलमालकाने त्याच्याकडून काहीच पैसे घेतले नाहीत पण सोय मात्र उत्तम केली होती. तूही तिथेच जा. तसा तोही तिथे जातो. तशीच मागणी करतो. सकाळी चेक आऊटच्या वेळी मालक त्याच्याकडून पैसे तर घेत नाहीच; उलट, त्यालाच पैसे देऊ करतो. आश्चर्याने तो विचारतो, 'माझ्या मित्राकडून तुम्ही पैसे घेतले नाहीत आणि मला तर वर पैसे देता आहात. हे कसे काय?' हॉटेलमालक म्हणतो, 'तुमचे चित्रण आम्ही केबलवर दाखवले म्हणून हे पैसे. तुमच्या मित्राचे फक्त क्लोज सर्किटवरच होते!'

तुम्ही म्हणाल  यात अश्लील काय आहे? ही तर रोजचीच गोष्ट झालीय. आमची छोटी मुलेपण डोळे टक्क उघडे ठेवून 'सच का सामना', 'राखी का स्वयंवर', 'इस जंगलसे मुझे बचाओ', 'रोडीज'असे शो टीव्हीवर बघतात. त्यांना या विनोदात काहीच अश्लील वाटत नाही. तुम्ही फारच बुरसटलेल्या विचारांच्या दिसताय. आजवर आपण दुसऱ्याच्या शयनगृहात डोकावणे हे भयंकर असभ्यपणाचे समजत होतो. कुणाचे वाकडे पाऊल पडले तर त्यापासून आपल्या मुलीबाळींना दोन हात दूरच ठेवत होतो. दुसऱ्याच्या खाजगी बाबीत नाक खुपसणे असंस्कृतपणाचे समजत होतो. पण हे सारे इतिहासजमा झाले आहे. 'इस जंगल से मुझे बचाओ'मधील तरुण मुले-मुली तोकडे कपडे घालून जंगलात मौजमजा करताहेत, एकमेकांना यथेच्च शिवीगाळ करताहेत. अपुऱ्या कपड्यात स्नान करताहेत.

असेच तर हिंदी चित्रपटातही असते, त्याला तर बंदी नाही ना घातलेली? असे म्हणणारे विसरतात की चित्रपट हे काल्पनिक कथानक आहे हे ध्यानात घेऊनच आपण ते पाहत असतो. त्यात अतिरंजितता, कल्पनाविलास असणार हे मानलेले असते. आपण थिएटरमध्ये तिकिट काढून गेलेलो असतो. त्यातही जिथे सभ्यतेच्या मर्यादा (याबद्दल प्रत्येक समाजाच्या धारणा वेगवेगळ्या असतात नि कालमानाने त्यात बदल हळुहळू होत असतात.) ओलांडल्या जाता तिथेही ते अयोग्यच वाटते. शिवाय, तिथे एक सेंसॉर बोर्ड असते! टीव्हीच्या पडद्यावर हे शो रिॲलिटी म्हणून दाखवले जात आहेत. जाहिरातींबद्दही बोलायला नको. त्यांना सेक्सखेरीज काही सुचतच नाही, मग चॉकलेट मॅनला चाटायला पोरी धावताहेत. एखाद्याने दारू घेतलीय का हे पाहायला जाणारी ड्युटीवरची तरुणी त्या तरुणाच्या माऊथ फ्रेशनरच्या वासाने वेडावून आपले केस नि कपडे सैल करू लागते. हा तरुणींच्या कार्यतत्परतेवर टोलाच असतो असे समजले तर?

'सच का सामना' या रिॲलिटी शोमध्ये प्रश्नाच्या खऱ्या उत्तराबरोबर सहभागी स्पर्धकाचे बक्षीस वाढत असते. त्याला खरे बोलण्यासाठी १ कोटी मिळणार असतात. लाय डिटेक्टरसारखे मशीन त्या स्पर्धकाच्या बोलण्याचे खरेखोटेपण तपासते असे दाखवले जाते. (आपण किती निष्पक्ष आहोत हे सिद्ध करायचा हा मार्ग.) त्यात एखादा वयस्क पुरुष आपण किती व्यभिचार केला याबद्दल- हळूच मित्राला वा मनोविकार तज्ज्ञाला नव्हे तर- साऱ्या जगाला आपण काहीतरी मोठा पराक्रम

केलाय अशा आविर्भावात सांगतो. आजवर मनाची नाही तर जनाची तरी लाज आपला समाज बाळगत होता. त्याला परोस्त्रायकाने जणू मुक्त केले आहे. खरे सांगायचे, म्हणजे सगळे धर्मराजाचेच अवतार झाले आहेत ना!

समाजातील प्रसिद्धीचा झोत ज्यांच्यावर थोडा आधिक आहे असे लोक, ज्यांच्या काही चांगल्यावाईट अभिनयाने लोकांच्या लक्षात राहिलेले चेहरे, या कार्यक्रमात येऊन आपले खाजगी जीवन पैशांच्या आशेने खुले करत आहेत. आजवर ज्यांनी आयुष्यात खूप रंगरलिया केल्या त्यांनाच साहजिक त्या 'सच का सामना'सारख्या कार्यक्रमात बोलावले जाणार. तुमच्याआमच्यासारख्या कुटुंब-वत्सल, सरळसाधे जीवन जगणारे लोक त्यांच्या दृष्टीने या कार्यक्रमाला नालायक नाही का? तुमच्या आयुष्यात दुसरा पुरुष नाही-स्त्री नाही, तुम्ही व्यभिचार केला नाही, नवऱ्याला वा बायकोला फसवले नाही, त्याला वा तिला मारले नाही, हे कसले तुमचे नीरस, एक्साइटमेंट, थ्रिल नसलेले मुळमुळीत जीवन? आम्ही रिॲलिटीवाले लोक तुम्हाला दाखवतो आता मर्द कसा जगतो. महत्त्वाकांक्षी स्त्री कशी जगते. तिचे लग्नाअगोदर गरोदर राहणे जरुरीचे असते. तिचे अनेक मित्र असणे, त्यांना फसवणे वा त्यांनी फसवणे जरुरीचे असते. दोघांतील एकाने पैशासाठी काहीही केलेले असते. जगात फक्त यशस्वी होणेच महत्त्वाचे असते. हेच आहे अस्सल जीवन, समजले? तुमचे मध्यमवर्गीय जीवन एकदम भंकस. हल्लीच्या मुला-मुलींनी आता जुने संस्कार, नीतिमत्ता गुंडाळूनच राहिले पाहिजे. मित्रमैत्रिणींबरोबर मौजमजा करणे, सेक्सबद्दल बिनधास्त असणे, रेव्ह पार्ट्यांची मस्ती अनुभवणे म्हणजेच जगणे आहे. संयम सोडा म्हणजे यशस्वी माणसांच्या जगण्याची झिंग तुम्हाला कळेल. हे वरणभात जगणे सोडून बिनधास्त जगायचे कसे हे आम्ही तुम्हाला दाखवतोय. चला, टीव्ही सुरू करा नि पाहा! ही नवी संस्कृती- नवे जग आहे.

हा संस्कार ठसठशीतपणे करणारे कार्यक्रम सध्या अनेक चॅनलवर बेधडक सुरू आहेत. शिवाय, असे कार्यक्रम असावेत का? याच्या चर्चाही तातडीने घेऊन त्याचाही टीआरपी वाढवण्याचा उद्योग सुरू आहे. मी हे लिहितेय म्हणजे मीही हे पाहतेच आहे ना? जुन्या मताचे, आजीबाई विचारांचे लोक, आंबटशौकीन तसेच मनोविकार असलेले लोकही हे पाहत आहेत. या चॅनलांनी हे शोज आणले त्यांना एक नवी समाजव्यवस्था आणायची आहे काय? नक्कीच तसे असावे. पण त्याची जबाबदारी मात्र ते घेणार नाहीत. तुम्ही नि तुमचे भाग्य. यश मिळवलेत तर या आमच्या शोमध्ये, अनुभव सांगा, आणखी पैसा मिळवा. शो लोक पाहताहेत आणि त्यावर इतर चॅनलवर चर्चाही घडवल्या जात आहेत. त्यात समाजव्यवस्थेचे कैवारी, लैंगिक बाबतीत सल्ला देणारे, मानसतज्ज्ञ, पालक, कार्यक्रम करणारे असे अनेकजण येऊन आपली मते मांडून गेलेत. आपण किती लोकशाही मानतो हे या चॅनलना दाखवणे आवश्यकच नाही का? त्याचे उद्दाम उत्तर दर्शकांच्या तोंडावर फेकले जात होते, 'तुमच्या हातात रिमोट आहे ना? मग पाहू नका असले वाटणारे कार्यक्रम. अशा प्रकारे लोकांनीच नाकारले तर आमचा टीआरपी वर जाणार नाही, आमचे कार्यक्रम बंद पडतील.'

रिमोट आपल्या हाती आहे हे ऐकायला किती छान वाटते ना? पण बाबांनो, त्यांचे खाजगी जीवन आम्हाला कशाला दाखवत आहात? आदिवासीपाड्यावरचे घर असो, झोपडपट्टीतले असो, मलबार हिलवरले वा कुलाब्याचे असो, तिथे घरातले लहानथोर टीव्ही पाहतात. हे पाहू नये म्हणून पालक मुलांच्या हातात कायम बेड्या ठोकू शकत नाहीत. मुले टीव्हीवर काय पाहत आहेत यावर नोकरीवर जाणारी आई सारखे लक्ष ठेवू शकत नाही. पौंगडावस्थेतील मुले, मनोरुग्ण लोक, गरिबीने गांजलेले लोक, हातात काहीच सुखाची साधने नसलेले लोक आपल्या घरात हे पाहत असतात. समाज म्हणून हा विचार व्हायला हवा, की काय दाखवले जातेय नि त्याचा परिणाम काय होणार आहे. लक्षात घ्या, या गोष्टी ऐकून-पाहून या गोष्टीला कुठेतरी समाज मान्यता देत आहे. या कार्यक्रम करणाऱ्यांना समाजाच्या नैतिकतेशी काही देणेघेणे नाही. तुमची मुले बिघडली, वंचिताने या चित्रिकरणाने वा ऐकण्याने प्रभावित होऊन वाममार्ग पत्करला तर त्याची जबाबदारी कुणाची असेल?

हे म्हणायला ठीक आहे की 'तुम्ही डोळे बंद करून घ्या!' आजच्या मोकळ्या जगात हे शक्य आहे. तुम्ही म्हणाल, जे काय आहे ते खुलेपणाने करा नि बोलाना. सत्याला बाहेर येऊ द्या. मग हे पचवायची ताकद सर्वांमध्ये सारखीच आहे का? विकृतीला मान्यता यातून मिळत जात आहे. पुन:पुन्हा आईच्या, बहिणीच्या समोर आपल्या वडिलांनी केलेला व्यभिचार मांडला जातोय! याला 'सच का सामना' म्हणायचे की निर्लज्जपणा म्हणायचे! दुसऱ्याच्या घरात डोकावायची इच्छा असते म्हणे, पण एखादा समाज तेच सारखं करत बसला तर? कोण थांबवणार या गोष्टीला? याचा अर्थ असा नव्हे की कुटुंबव्यवस्था वा घरे असत्यावर, खोटेपणावर चालावी.

या कार्यक्रमाचे स्वरूप काय असते? तर साधे सरळ असते. तुम्हाला प्रश्न विचारले जातात. बहुतेकांचे स्वरूप खाजगी जीवनाबद्दल असते. जसे तुम्ही वडिलांचे लाडके होतात का? तुम्ही घर सोडून का पळालात? तुम्ही खरे उत्तर द्यावे अशी अपेक्षा असते. समोर एक लाल दिवा ठेवलेला असतो. उत्तर खोटे असेल तर तो पेटतो. खरे असेल तर तुम्हाला पुढचा प्रश्न विचारला जातो नि बरोबर असेल तर तुम्हाला पुढच्या पायऱ्या चढत वर जाता येते. पैसे मिळत जातात. मग पुढचे दुसरे प्रश्न विचारले जातात. केवळ सत्याच्या कसोटीवर तुम्हाला एक कोटी रुपये कमावायचे असतात. मग हे साधे प्रश्न तुमच्या अत्यंत वैयक्तिक अनुभवांशी खेळू लागतात. तुम्ही तुमच्या

पत्नी-खेरीज इतर कुणाशी, मग ती स्त्री वा पुरुष, संभोग केलाय का? तुम्ही याबाबत सहचराशी खोटे बोलला आहात का? आपल्या मुलीच्या वयाच्या तरुणीशी शय्यासोबत केलीय?- समोर त्या व्यक्तीची आई, बहीण, लेक, पत्नी, नातलग वा मित्र असतो. यातले त्यांना कदाचित काही ठाऊकही नसते. त्यांच्या चेहऱ्यावर कॅमेरा फिरत असतो, त्यांची अस्वस्थता प्रेक्षक पाहत-अनुभवत असतात. तेच त्यांच्या टीआरपीचे गमक असते! मग तुम्ही खरे उत्तर देता, 'हो!' खरे बोलल्याबद्दल तुम्हाला शाबासकी आणि पुढे जाण्याची संधी मिळते. एकेक करत अवघड प्रश्नांची खरी उत्तरे द्यायची असतात. अनौरस मुले, अनेक स्त्रियांशी संबंध, खोटे वागणे याबद्दल जर तुम्ही खरे सांगितले तर पैसे मिळतात. आजवर आलेल्या स्त्री-पुरुषांनी आपले खाजगी जीवन, आपली लफडी, भांडणे सांगून आपल्या आईला- जी बिचारी साधीभोळी तुमच्यासाठी झिजलेली गृहिणी असते तिला आपल्या लेकीचे/लेकाचे पराक्रम पहिल्यांदाच कळतात. ती कोसळते. हेच तर लोकांच्या लक्षात राहण्याजोगे क्षण असतात!

पण अशा कार्यक्रमात एकेका प्रश्नाच्या बरोबर लाखोंनी पैसे मिळत जातात नि प्रश्नही अधिकाधिक तुमच्या शयनगृहातील कोपऱ्यात उभे राहू लागतात. खरे तर उद्देश तोच आहे. पाश्चात्त्य संस्कृतीतील हे विकृत फॅड आपल्याकडे आणले, आणवले जात आहे. हे मी आपल्या आपल्या संस्कृतीच्या आढ्यताखोर अभिमानाने म्हणत नाही तर बाजाराभिमुख व्यवस्थेत तुम्ही जे काही विकृत विकू शकाल त्यावर तुमचे महत्त्व ठरते आहे. त्यासाठी पहिला बळी जातो तो हळुवार भावनांचा, निरागसतेचा, भोळेपणाचा, चांगुलपणाचा, सभ्यतेचा, अनाग्रही सुसंस्कृततेचा. इथे तुम्ही किती आक्रमकपणे आपल्या वासना मांडता, आयुष्यात प्रत्यक्षात आणता यावर तुम्हाला प्रतिष्ठा मिळताना दिसते. समाजाचा दुटप्पीपणा इथेही असतोच. कल्पना करा, एखाद्या गरिबाने, बेकाराने हे केले तर त्याला लाथाडले जाईल, धुत्कारले जाईल. इथे आयांनी ओरड केली की तुम्ही पोरे नि थोरे बिघडवता आहात तर त्यांना जुन्या मताचे ठरवून फटकारले जाईल. मागे पडायची धमकी मिळते कारण इथे पुढे जाण्याला महत्त्व आहे. कसेही जा पण इतरांना चिरडून, त्यांच्या भावनांचा विचार न करता पुढे जा, पैसा मिळवा, खूप खा, खूप ऐश करा, तो तुमचा हक्क आहे. बाकी सारं बकवास आहे.

शेवटी कार्यक्रम करणारेही सारे सत्य, उघडे लैंगिक जीवन दाखवत नाहीत ना? म्हणजे तेही सेंसॉर करतातच ना? मग हा प्रकार खुबीने करतात. प्रथम हळुहळू मुलींच्या अंगावरचे कपडे कमी करायचे, तिचा देह किती सुंदर आहे, देवाने किती सौंदर्य दिलेय असे पटवायचे, मग ते समाजाच्या पचनी पडले, लोकांच्या अंगवळणी पडले, की मग तोच प्रकार शारीरिक जवळिकीबद्दलचा करायचा! तसे करून त्यांना त्यांची प्रॉडक्ट विकायची असतात. मग त्याकरता सभ्य लोकांना, स्त्रियांना काकूबाई ठरवायचं, तुम्ही एक्सायटिंग काम करावे, एकमेकांपासून काहीतरी लपवावे, मजा करावी, त्यात गैर काय आहे? असा निरागस वाटणारा प्रश्न हळूच टाकला जातो. तोवर लोकांची संवेदनाही कमी झालेली असते. ते हेही मान्य करतात की कुठल्याही नातेसंबंधात निष्ठा ही संदर्भहीनच असते. स्वत:चे सुखच महत्त्वाचं असतं, यशच सर्वांत अधिक किमती असते. बरे आजवर समाजात हे एखाददोघे कुणीतरी अपवादाने असे स्वैर वागत आले आहेत. समाज काही फारसा सोवळा होता का आमचा? हे सगळे चाललेच होते. मग? आता ते खुल्लमखुल्ला बोलतोय एवढे म्हटले की जणू या गोष्टींना नैतिक पाठबळ दिल्यासारखे त्यांना वाटते.

हे एवढेच नाही. हे सारे रिॲलिटी-च्या नावाने चाललेले मोठे नाटक आहे. बऱ्याचदा रिॲलिटी शोजचे स्क्रिप्ट लिहिलेले असते. कुठे-कोणी आक्रमक बोलायचे, अंगावर चालून जायचे, अर्वाच्य शिव्या द्यायच्या, रडायचे, अपमान करायचे हे सारे ठरवून केलेले असते. वरून ते तसे दिसू नये यासाठी कडेकोट बंदोबस्त केलेला असतो. हे सारे कळल्यावरही आपण एवढी चर्चा का करतोय? कारण ही माध्यमे समाजमनावर प्रभाव टाकतात, त्यांचे सामर्थ्य खूप आहे. म्हणूनच त्यांचे वाकडे पाऊल समाजाला वाममार्गाकडे नेऊ शकते. ही मंडळी समाजात चुकीच्या मूल्यांना प्रतिष्ठित करू पाहताहेत नि त्यांच्या विक्रीकौशल्याने ते त्यात पाश्चात्त्य जगात यशस्वी झालेत तसे इथेही होतील. आज आपले प्रश्न काय आहेत? सामाजिक मूल्यव्यवस्था काय आहे? आर्थिक उतरंड, जातीय समीकरणे काय आहेत? स्त्रीपुरुष असमानता किती आहे? परंपरांचे ओझे स्त्रीवर किती आहे? अशात तिच्यावर आक्रमक होण्याचे, सुंदर दिसण्याचे, महत्त्वाकांक्षी होण्याचे दडपण आणायचे? जिथे भुकेला समाज आहे तिथे ही शाब्दिक वखवखही विपरीत परिणाम करू शकते. नव्हे, करत आहे. कशालाच न जुमानणारे राजकारणी दिसताहेत, नोकरशहा, व्यापारी, शिक्षण क्षेत्रातील लोक दिसताहेत. अशा वेळी हे तथाकथित सत्याच्या प्रयोगाचे भीषण नाटक समाजाला रसातळाला पोचवेल.

वर म्हणायचे की येथील संस्कृती काही एवढी लेचीपेची नाही, की एखाददोन कार्यक्रमांनी नासेल. मान्य. पण लक्षात घ्या, रात्रंदिवस देहाचाचे प्रदर्शन, वासनांचे उद्दिपन आणि वाममार्गाने संधी मिळण्याची झलक दाखवली जात आहे. त्याचा परिणाम गुन्हे वाढण्यात, मूल्यांचे अध:पतन होण्यात व्हायला लागला तर तो थांबवणे तुम्हा-आम्हाला शक्य नाही. पाश्चात्त्यांसारखी इथे घट्ट सक्षम पोलिसयंत्रणा नाही, की सामाजिक धक्के पचवायला योग्य समुपदेशन केंद्रे नाहीत नि मुळात संवेदनशील समाजमनच नाही. जसे

करावे तसे भरावे म्हणत आपण अंग झटकून मोकळे होऊ नि भलतेच कुणीतरी याची शिकार होतील. ज्यांकडे पक्की आधार देणारी कुटुंबव्यवस्था नाही, निराशा, पराभव पचवण्याची शक्ती नाही, आर्थिक क्षमता नाही अशांनी मग मनाला सावरायचे कसे? हे लोक तर समाजात मानसिक, भावनिक, वैषयिक गोंधळ घालून मोकळे होतील, दुसऱ्या कुठल्यातरी वस्तूच्या विक्रीतंत्राकडे जातील.

कदाचित नैतिकतेने काम करण्यातच कसे भले होऊ शकते असे दाखवणे फॅशनेबल होईल! पण तोवर वाट पाहायची की वेळेवारीच याला लगाम घालायचा? हे तुम्ही-आम्ही ठरवायचे आहे. असत्याचे हे प्रयोग पैशांच्या जोरावर, पैशांसाठी आणि पैशाने चाललेले उद्योग थांबले पाहिजेत. इस जंगल से बचाओ! राखी का स्वयंवर, सच का सामना यांसारखे रिॲलिटी शो एक नवी बुवाबाजी पसरवत आहेत. आता म्हणे राहुल महाजनचे स्वयंवर येत आहे. कसल्या लोकांना आपण मोठे करत आहोत याचा विचार करा. लग्नाचा बाजार जोरावर आहे. प्रचंड पैसे त्यावर खर्च होतात. डिझायनर, कपडे, दागिने, खाद्यपदार्थ, सजावट यांवर खर्च होतात. उद्योगपती आणि विदेशी भारतीय त्याबाबत आघाडीवर असतात. खाजगी निवड ही अशी जाहीर करायची. त्यातही सारे ठरवलेलेच असायचे. त्यानंतर ती राखी सावंतसारखी स्त्री म्हणणार मी या माणसाशीच लग्न करेन असे नाही!! मग हे सारे नाटक नव्हे का, खरे म्हणून केलेले? एक नवा शो येतोय ज्यात मित्रांमधील भांडणे, असूया, कट, कारस्थाने यांची रेलचेल आहे नि त्यात एक खूनही होणार आहे. रिॲलिटीच्या नावावर. याला काय म्हणाल?

समाजात वाममार्गाच्या गोष्टींबाबत ग्लॅमर निर्माण करायचा हा प्रयत्न आहे. वर शहाजोगपणे हे सांगितले जाते, तुम्ही जाऊ नका ना त्या मार्गाला! खरंय. मग तुमच्या सभ्य वस्तीत डान्सबार चालू द्या ना? कॉलनीत चरसगांजा ओढणारे अड्डे असले तर कुठे बिघडले? तुमचे संस्कार घट्ट आहेत ना? तुम्ही वा तुमच्या घरचे त्या वाटेला जाणारच नाहीत; याची खात्री हवी तुम्हाला. पण समाज म्हणूनही आपण असे होऊ देत नाही. या गोष्टी आहेत हे माहीत असते तरी कुणी त्याचे असे प्रदर्शन मांडून त्यातून प्रतिष्ठा नि सत्य सांगितल्याचे मोठेपण मिरवत नाही. आज हे घडतेय. त्याची चर्चा करून त्यांचे महत्त्व वाढवायला नको हे खरेय, पण हे वखवखलेले प्रॉडक्ट विक्रेते समाजात नंगा नाच घालत राहतील नि आपण स्वस्थ बसायचे का?

या माध्यमांनी स्वनियंत्रण केले असते तर ही वेळ आलीच नसती. पण ही मंडळी सृजनशील नि समाज घडवणाऱ्या लोकांच्या हातात नाहीत, तर आपले सामान विकायला स्वत:च्या अंगावरचेही कमी करायला मागे न पाहणारे लोक त्यामागे आहेत हे ध्यानात घ्यायला हवे. यांना काय मोठी सत्याची चाड आहे असे वाटतेय का? की ते गांधीजींसारखे सत्याचे प्रयोग करताहेत? त्यांना लोकांना रिझवायचे आहे नि आपल्या वस्तू घ्यायला लावायच्या आहेत. विकृतीचा आधार त्यासाठी घ्यावा लागणे यात काय वाईट आहे? कारण त्या प्रत्येक शोमध्ये मालामाल होण्याची संधी असते. त्यातून अनेक घरे तुटलीत, तर म्हणे असत्याने आजवर अनेक घरे तुटली आहेत. आता सत्याने तुटली तर काय झाले? इथे कुणाचे काही जात नाही. कुणीतरी अनैतिकतेच्या वागण्याचा ग्लॅमर मिळवायला वापर करतेय नि हळुहळू हेच बरोबर आहे, त्यात गैर काय असे वाटायला लागले तर कोणते औषध देणार तुम्ही? यावर व्यावसायिकांचे दडपण असावे, सेन्सॉर म्हटले की आपल्याला आणीबाणी आठवते. पण समाजात अनैतिकतेची आणीबाणी येण्याअगोदर काहीतरी लगाम यावर असायला हवा असे कुणीही सूज्ञ व्यक्ती म्हणेल.

दुसरा एक असाच कार्यक्रम आहे. तुम्हाला प्रचंड भीती, किळस वाटेल असे काहीतरी करायला लावायचे. ज्यात तुम्हाला किडे वळवळत असलेले पाणी प्यायला लावायचे, तुम्हाला अशा पेटीत बसवायचे जिथे अनेक सरपटणारे जीव तुमच्या अंगावरून फिरतील. तुम्हाला प्रचंड उंचीवरून खाली ढकलून द्यायचे. रोडीजसारख्या कार्यक्रमात तरुण मुले-मुली मोटारसायकलवरून अवघड टास्क करायला बाहेर पडतात. 'दादागिरी' या कार्यक्रमात एक दंडेली करणारी व्यक्ती-अनेकदा स्त्री-इतरांना वाटेल ते करायला लावते. तुमच्या टीमची हार झाली तर तुमच्या टीममधील तरुणांच्या गुप्तांगावर फटके मारले जातात. तिथे तरुण लोक एकमेकांना आई-बहिणीवरून यथेच्छ शिव्या देतात. संकटात, कमी पैशांत, कमी अन्नात कसे टिकून राहता, एकमेकांना मागे सारून, उपाशी ठेवून तुम्ही स्वत: कसे पुढे जाता याचा गेम असतो. थोडक्यात, दुसऱ्याला कमी लेखत, अर्वाच्य शिव्या देत, घालूनपाडून बोलत नि तुच्छतेने वागवत टिकता कसे हे दाखवायची ही स्पर्धा! लोकांच्या जगण्यात आलेली मरगळ म्हणे अशा प्रोग्रॅमने झटकली जाते.

शिवपुराणात एक गोष्ट आहे. त्यात म्हटलेय की कलियुगात लोक अशा एका देवीची आराधना करतील जिच्या एका हातात जीभ असेल नि दुसऱ्या हातात लिंग असेल. आज याच दोन गोष्टींभोवती या रिॲलिटी शोजचा विचार फिरताना दिसतोय. आपणच हे ठरवायचेय की आपल्या देशात हे चालू द्यायचे का? भारतीय पुरातन संस्कृती वगैरे शब्द मी वापरत नाही, पण सुसंस्कृत पिढी यातून घडेल का? हे नक्कीच विचारात घेतले पाहिजे.

---

**- संजीवनी खेर**
वैशाली अपार्टमेंट, १७६/अ,
भालचंद्र रोड, हिंदू कॉलनी,
दादर (पूर्व), मुंबई - ४०० ०१४.
भ्रमणध्वनी : ९८२१४११४७२

# 'नेहरूनगर' – त्याच्या बालपणीचे

अनुराधा गांगल

नुकताच आमच्या घरी प्रसाद मोकाशी, लोकसत्ता-पत्रकार आला होता. त्याला चहाचा कप देताना मी त्याच्या जवळच बसले. 'प्रसाद, केवढा मोठा झालास तू! अरे, जर तू मला रस्त्यांत भेटला असतास तर मी तुला ओळखलेच नसते.' मला तो खेळणारा, उड्या मारत घरात शिरणारा, शाळेत जाणाराच प्रसाद आठवतो आहे.

गप्पा मारून तो निघाला, पण मी मात्र नेहरूनगरमध्ये जाऊन स्थिरावले. माझ्या मनी, माझ्या डोक्यात पंचवीस-तीस वर्षापूर्वीचे दिवस बागडू लागले. अनेक गोष्टी हातात हात घालून मन:पटलावर सरकू लागल्या.

नेहरूनगर कुर्ला स्टेशनच्यालगत, पूर्वेला वसलेले आहे. मुंबईमध्ये अनेक खाड्या बुजवून अनेक नगरे उभी राहिली आहेत. त्यांपैकीच एक आमचे हे टुमदार नेहरूनगर. १९६४-६५ साली या नगरातील सर्व इमारती बांधून झाल्या आणि अनेक कुटुंबे आपला 'छबिला - बाड बिस्तार' घेऊन नांदण्यासाठी, आपल्या संसाराची गोड स्वप्ने मनाशी घट्ट धरून या घराघरातून राहयला येऊ लागली. आम्ही १९६७ साली ३४/९०२ या ऐतिहासिक वास्तूमध्ये आमचा संसार मांडला.

मी मुंबईत नवीनच होते. मुंबईत भटकताना मला एक गोष्ट आवर्जून दिसून आली. उंच इमारती, त्यांत वास्तव्य करणारे मोठमोठे व्यापारी, कलावंत, धनवान-बुद्धिमान ऑफिसर, धनाढ्य कंपनीमालक-राजकारणी अन् त्या रंगीत, मनमोहक इमारतींच्या पायथ्याशी एखादी छोटीशी झोपड्यांची वस्ती. बसमधून प्रवास करताना मुंबईचे हे चित्र माझ्या मनात खोलवर रुतून बसले. माणूस कितीही मोठा महान, धनवान, कीर्तिवान झाला तरी त्याच्या मनातील गरिबीबद्दल कनवाळूपणा दूर होऊ नये म्हणून ही योजना असावी अशी समजूत माझ्या मनात ठासून राहिली आहे.

कुर्ला स्टेशनच्या पूर्वेला बाहेर पडले की प्रथम झोपड्यांचीच वस्ती लागते. मग छोटी गल्ली पार केल्यावर नेहरूनगरच्या इमारतींचे जग सुरू होते. नेहरूनगर वसाहतीच्या बालपणी म्हणजे ६६-६७ साली या रस्त्यावरील दुकाने अन् नगरात जाणारे रस्ते, गल्ल्या छोट्या होत्या. आता मात्र हा रस्ता मोठमोठ्या दुकानांनी सजला आहे. नेहरूनगरातले अंतर्गत रस्तेही मोठे झाले आहेत. इतकेच काय, इमारतींनीही सुंदर, रंगीबेरंगी 'झगे' घातलेले आहेत. पूर्वीच्या इमारती आता वाढीव 'एफएसआय'मुळे पार बदलून गेल्या आहेत. प्रत्येक पिढीमध्ये आजी-मुलगा-नातू-पणतू यांच्यातील फरक जसा प्रभावित करतो तसे आमच्या नेहरूनगरचे झाले आहे. जुनी अंगडी टाकून रंगीत वसने ल्यालेल्या नेहरूनगरची 'छबी' तरतरीत, रंगीत, उठावदार, करणारी झाली आहे.

पूर्वीच्या या आमच्या नेहरूनगरात अनेक डॉक्टर, सेल्सटॅक्स-इन्कमटॅक्स अधिकारी, एलआयसी, सचिवालय यांमधून काम करणारे ऑफिसर, पत्रकार अशा विविध क्षेत्रांत काम करणारी मंडळी राहायला येऊ लागली. हळुहळू सर्वांची ओळख होऊ लागली. मैत्री वाढू लागली.

आम्ही २ जुलै १९६७ रोजी नेहरूनगरात राहायला आलो. त्याच दिवशी सोबत आणलेल्या अनेक वस्तू मी योग्य ठिकाणी लावीत होते. झालेला प्रचंड कागदांचा ढीग समोरच्या बाजूला एके ठिकाणी ठेवून दिला होता. पहाटे सहा वाजताच 'गुरख्याने' दार ठोठावले. अन् एका कागदात बांधलेले 'ह्यांचे' बूट आणून दिले. घरात आल्या आल्या, संसाराला सुरुवात करतानाच 'सच्चा' अनुभव घेतला. तो नमूद करताना मला आनंद होतो आहे. हा सच्चेपणा अजूनही गाठीशी बांधला गेला आहे. त्याच दिवशी संध्याकाळी पुण्याचे एक पत्रकार मित्र आमचा पत्ता शोधत आमच्या घरी राहयला आले. पिठलं-भात. जेवून मस्त अंधारात (कारण अजून सर्व विजेचे काम व्हायचेच होते.) गप्पा मारीत, त्यांच्या पाहुणचाराचा पहिल्यांदाच घेतलेला तो अनुभवपण गाठीशी पक्का बांधला गेला. तिसऱ्या दिवशी गांगलांचा शाळेतील मित्र 'केळकर' चार दिवस 'विजेच सर्व काम' करण्यासाठी रहायलाच आला. पत्रकार जगन फडणीस अन् शैला फडणीस यांनी घरी येऊन मैत्रीचा हात आमच्या हाती दिला. तेव्हापासून आमच्या मित्रपरीवाराचे धागे बांधले गेले ते आजपर्यंत सतत टिकले आहेत. लग्नानंतर आम्ही फिरायला किंवा सिनेमाला जात होतो ते चौघेजण मी, गांगल, अरुण साधू, अन् अशोक जैन. एखाद वर्षानंतर आम्ही दोघेच चित्रपट पहायला गेलो होतो. बाहेर पडताच मी म्हटल, अरेच्या आज आपण दोघेच आहोत चित्रपट पहायलात्र एखाद्या माणसाच्या स्वभावामुळे हा सारखा काय आपल्या बरोबर येतो आहे? असे वाटते.

पण जैन व साधु यांचे आमच्या बरोबरचे असणे त्रासदायक, कष्टदायक तर सोडाच. आम्ही तर चौघे भावंडांप्रमाणे वावरत होतो. आजही त्या स्मृती आल्हादायक, स्फूर्ती दायक मनाच्या कोपऱ्यात आनंददायी रुतून बसल्या आहेत. हा त्या दोघांचा स्वभाव विशेष 'कारण' आहे.

नेहरूनगरात आम्ही समव्यवसायी भरपूर जण होतो. दिनकर गांगल, अरुण साधू, अशोक जैन, सुधीर नांदगावकर, वसंत सोपारकर, अत्तार, प्रफुल्ल मोकाशी, धृव, अरविंद कुलकर्णी, बाळ देशपांडे, जगन फडणीस, जोसेफ नरोन्हा, जावेद सिद्दिकी, देसाई, भारतकुमार राऊत, तसेच अनेक गुजराथी, हिंदी, इंग्रजी पत्रकारमित्र अरुण घाटे, राजा पारगावकर, प्र. ना. परांजपे, सुरेश सावंत, गुप्ते, जोशी, फोटोग्राफी करणारे मोहन नावेलकर अशी किती नावे सांगावीत? आमचा हा मित्रपरिवार इथेच थांबला नाही. त्यात रोज अनेक नावे पदार्पण करत राहिली.

नेहरूनगरची रचनासुद्धा अगदी मस्त होती. मला तर ती 'चक्रव्युहा'सारखी वाटत असे, म्हणजे गल्लीत शिरले की इमारत क्रमांक एकपासून गोलाकार रचनेला सुरुवात होई. ह्या इमारतीपण तिरप्या तिरप्या पद्धतीने बांधल्या होत्या. जेणेकरून प्रत्येक घराला हवा-पाणी-उजेड व्यवस्थित लाभावा. इमारत क्रमांक एकपासून या तिरप्या इमारतींचा गोलाकार भाग, मग रस्त्याचा गोलाकार भाग, मग परत इमारतींचा भाग, तो असा की रस्त्याच्या एका बाजूला इमारत क्र. एक तर रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला इमारत क्रमांक चौतीस अन् त्यांची तोंडे एकमेकांच्या समोरासमोर. मग परत गोलाकार रस्ता अन् अगदी मधोमध गोलाकार मोठे पटांगण. अशी ही सुंदर, मोहक रचना नेहरूनगरमध्ये नवीन आलेल्या माणसालाही पटकन आपलेसे करून टाकत असे.

डॉ. तामणे, डॉ. बिनिवाले, डॉ. पंडित, डॉ. सुपे, डॉ. फडके असे अनेक डॉक्टर नेहरूनगरचे रहिवासी होते. आमच्या खूप मोठ्या मित्रपरिवारात डॉक्टर सहज सामावून गेले होते. माजी मुख्यमंत्री बाबासाहेब भोसले हेही आमच्या नेहरू नगरचेच रहिवासी. कधी सकाळी जर दुधकेंद्रावर दुध आणायला गेले तर बाबासाहेबही रांगेमध्ये दृष्टिस पडायचे. असे आम्ही सगळेच नेहरूनगरचवासी त्या वेळेस एकरुप होऊन संसारी मग्न झालो होतो.

आमची ३४/९०२ ही वास्तू 'ऐतिहासिक' ठरली ती 'ग्रंथाली'च्या व्यवहाराचे पहिले ठिकाण म्हणून. इथल्या पोस्टात सर्वाधिक पत्रे यायची ती याच पत्त्यावर. सर्वदूर अपरिचितांशी भावबंध जोडणारी वाचक चळवळ इथे मूळ धरत होती. ग्रंथालीच्या अनेक पुस्तकांची मांडणी अरुण घाटे यांनी केली आहे. त्यामुळे त्यानिमित्ताने त्यांची फेरी आमच्या घरी कायम असे. अशोक जैन रोजच सकाळी, 'शिट्टी' मारून साद घालत असे. अरुण साधूंचे पहिले पुस्तक 'मुंबई दिनांक' आठवते. दहा-पंधरा पाने झाली की ते त्यावर चर्चा करायला किंवा ती पाने दाखवायला येत असत. संध्याकाळी तर हे तिघेही एकदमच यायचे. मग आमची चहा, जेवणे एकत्रित होत. सुधीर नांदगावकर एखाद्या चित्रपटाची चर्चा करायला येत. प्र. ना. परांजपे अन् वसुधा परांजपेही वरचेवर गप्पा मारायला येत. जगन फडणीस त्यांच्या घरातून निघाले की आमच्या घरी येऊन विधानसभेतील 'शरद पवार, ते, साधू' यांच्या चर्चेचे यथासांग वर्णन करत. प्र. ना. परांजपे पुण्याला स्थायिक झाल्यावर त्यांच्या रूममध्ये भारतकुमार राऊत राहायला आले. ते, नीना व छोट्या (ओम) फिरायला जाताना किंवा अगदी सहजही गप्पा मारायला येत असत. दोघेही अगदी हसतमुख होते. आमचे घर हे कॉलनीत शिरल्यावर लगेचच म्हणजे इमारत क्रमांक एकच्या समोर होते. त्यामुळे स्टेशनवर जाताना किंवा येताना सर्वांना आम्हाला 'हाळी' घालणे सोयीचे होते. राजा पारगावकर त्यांच्या वाचलेल्या पुस्तकावर किंवा चित्रपटावर चर्चा करायला येत. डॉ. तामणे आमच्या बाजूला व्हिजिटला आले की, किंवा मुद्दाम वेळ काढून बातचीत करायला येत. त्याचमुळे आमचे घर सतत चालते-बोलते असे.

चौकोनी कुटुंबापेक्षा घरात आजी-आजोबा असणे केव्हाही मस्त वाटते. मला आजी होती अन् दिवसभर काही चुका झाल्या तर ती म्हणे रात्री गोष्ट सांगेन त्याची. ती गोष्ट ऐकताना येणारी मजा औरच असते. सांगून किंवा लिहूनही ते कळणार नाही. तसेच आमच्या सर्वांच्या या चौकोनी कुटुंबावर गोड नजर ठेवायला किंवा 'नमस्कार' करायला, आमच्या पाठीवर शाबासकीची थाप देण्याला मोठी माणसेपण होती. अशोक जैनचे आई-वडील होते. त्यांना बाई अन् भाऊ म्हणत असू. भाऊ आंबे घेऊन आमच्या दारावरून चालले की जोरात हाक मारत, 'अनुराधा, इकडे ये. हं घे अंबे, उचल.' सणावाराला बाईंना नमस्कार केला, तर बाई परत आम्हाला नमस्कार करत. कारण आम्ही ब्राह्मण ना! एकदा अशोक त्यांना म्हणाला, 'काय गं' त्या साधू-गांगलला नमस्कार करतेस. ते 'सर्व' खातात बाई. त्यावर त्या म्हणाल्या, 'अरे, ब्राह्मण किती झाला भ्रष्ट तरी तिन्ही लोकी श्रेष्ठ!' मात्र त्यांची राहणी, त्यांचे मौनव्रत, त्यांचे उपवास, त्यांची वृत्ती, या सर्वांमुळे खरे तर त्याच श्रेष्ठ होत्या. आमच्या सुदेशची आई- आम्ही त्यांना वहिनी म्हणतो- त्याही अगदी प्रेमळपणे आईच्या मायेने येत. विचारपूस करत, सल्ला देत, प्रेमाने हवे-नको सांगत. येताना काही खाऊ आणत. आजी खाऊ देते ना नातवंडाना तशा. माझे 'सासरे'सुद्धा काही महिने अंधेरीला अन् काही महिने आमच्याकडे राहात. उंच, शिडशिडीत, गोरे-घारे असे आमचे 'नाना' रोज संध्याकाळी कॉलनीत फेरी मारत. ते अंधेरीला गेले की आजुबाजूची मंडळी म्हणत, तुमचे 'आजोबा' इथे नाहीत वाटते.

डॉक्टर तामणे यांचेही आई-बाबा त्यांच्या घरी येत. त्यांचा तो प्रसन्न, हसरा, सुंदर, शांत चेहरा अजूनही नजरेसमोर येतो. ही सर्व किमया त्यांच्या चेहऱ्यातच होती. त्यांच्याकडे बघितलं, त्यांच्याशी बोललो की तृप्त व्हायला होई. त्यांच्याकडे गणपती अन् गौरींचे दर्शन घेणे असायचेच, पण आजींच्या गप्पा ऐकल्या की 'दुधात साखरच पडली' याचा प्रत्यय येई. नांदगावकरांच्या मोठ्या बहिणी येत असत. त्याही नांदगावच्या गप्पा सांगत.

काही मोठी माणसे अन् तरुण मंडळी यांच्यात वाद असतात, भांडणे असतात. पण दोन्ही मंडळी जर समजून घेणारी विनोदी, हसरी, समजूतदार असली तर फार फार मजा येते. या वडीलमंडळींकडून अनेक गोष्टी कळतात, कथा कळतात, अनुभव कळतात. त्यांची चेष्टा-मस्करी करतांनासुद्धा आपुलकी वाटते. आपल्या ओंजळीत अनेक गोष्टींची भर पडते. ही मोठी मंडळी आजूबाजुला असावीत असे वाटतच राहते. मी माझ्या आजीची चेष्टाही करत असे. अन् आजीही त्याला तसेच मस्त उत्तर देत असे. ही मोठी माणसे अनुभवाच्या इतिहासाची पानेच वाटतात. ती घरात हवीतच.

पत्रकारमित्रांच्या आम्हा बायकांचाही एक मोठा ग्रुप बनून गेला. तो थोड्याच काळात इतका घट्ट बनला की आजही आम्हा सर्वांची नातलगमंडळी जी दूरदूर असतात त्यांच्याही तोंडी प्रथम नावे येतात ती आमच्या ग्रुपमधील मैत्रिणींचीच. आमच्या घरांतून सासर-माहेरची मंडळी आलीच तर त्यांच्या तोंडातून 'कमल कशी आहे? अरुणा काय म्हणते? सुनंदा, शैला, अनिता, वहिनी कशा आहेत ग? हेच प्रश्न प्रथम विचारले जातात.

आम्ही ग्राऊंडफ्लोअरवर राहत होतो अन् जैन-साधू चौथ्या मजल्यावर. गांगल आणि ते दोघे यांना मी 'श्रीदत्त' मानत असे. तिघेही छान दोस्त होते, आहेतही. रात्री तिघेही वाचलेल्या पुस्तकावर चर्चा करत



असत. चर्चा करतांना मधूनमधून चहा अन् बाजूला 'ॲश ट्रे' भरलेला. एकदा 'अजगर' पुस्तकावरील त्यांची चर्चा ऐकून मला वाटले होते आता हे तिघे एकमेकांची तोंडे पाहणार नाहीत. पण सकाळी नऊ वाजता हे दोघे दारात 'दत्त' म्हणून उभे! सुधीर नांदगावकर अन् जगन फडणीस असेच ऑफिसला जाताना 'हाळी' घालत. प्रत्येकांच्या गप्पांचे विषय वेगवेगळे असत. नांदगावकरांचा सिनेमाविषयी अन् फडणीसांचा विधान-भवनातील 'राजकारण' हा विषय तर येत असेच असे. 'राजकारणी' लोकांचे राजकारण वेगळे, त्याचा थांगपत्ताही लागत नाही. पण या सर्वांचे राजकारणावरील भाष्य, या मित्रांचे राजकारण सचोटीच्या पायावर बेतलेले असे. मला नेहमी अंचबा वाटे की ही मंडळी इथे 'राजकारण' वेगळेच करताहेत. त्यांच्या 'ऊहापोहाने' प्रत्यक्ष राजकारणावर किती परिणाम होणार आहे? मला अनेकदा असेही वाटे की आताच्या राजकारण्यांनी 'रजा' घ्यावी किंवा आपणच त्यांना 'VRS' घ्यायला लावावी. राजकारणात आमच्या सचोटीच्या शारदा साठे, सुजाता खांडेकर, मृणाल साठे, छाया दातार, ज्योती म्हापसेकर, मीना देवल यांनी पडावे. त्यामुळे सर्व जागी वेगळेच वातावरण नांदेल.

आमच्या सर्वांच्याच राहण्याच्या जागा छोट्या होत्या. तरीही आम्ही सगळ्या मुलांसह आषाढी एकादशी, हरतालिका, वटपौर्णिमा, महाशिवरात्र असे 'उपवास' एकत्रित साजरे करत होतो. प्रत्येक जण एकेक पदार्थ घेऊन येत असे. आम्ही आठजणी, आमची मुले आमचा सकाळचा अन् रात्रीचा दोन्ही वेळेचा उपवास करत होतो. आमची मुले फार गुणी झाली ती या बांधलेल्या धाग्यांमुळेच. दररोज संध्याकाळी आम्ही मैत्रिणी मुलांना घेऊन ग्राऊंडमध्ये बसत असू. आम्हा कोणालाच आमच्या मुलांचा त्रास कधी झाला नाही. मुले एकत्रित खेळत अन् आम्ही मैत्रिणी एकत्रित गप्पा मारत असू. आमच्यापैकी काहींचे पत्रकार नवरे रात्री दहा-साडे दहाला येत. त्यामुळे आम्ही पत्रकारपत्नी छान मोकळ्या भरपूर गप्पा मारून घरी परतत असू.

मुंबईत या नव्या वस्त्या 'खाड्या' बुजवून केल्यामुळे पावसाळ्यात ग्राऊंडफ्लोअरच्या लोकांचे फार हाल होत

असत. पावसाळ्यात आमचे हे नेहरूनगर समुद्रात बोटी असाव्यात तसे दिसत असे. सर्व इमारतींच्या चहू बाजूंनी पाणी अन् मध्ये मध्ये इमारती. त्यांत रात्री बेडकाचे ओरडणे अन् लोकांचे ते पाणी तुडवत अंधारात घरी येणे. अंगावर काटा येई. पण असेही दिवस आनंदात काढले गेले. चौथ्या मजल्यावरील मित्रांकडे जात काढले ते केवळ या घट्ट धाग्यांमुळे, एकमेकांच्या प्रेमळ स्वभावामुळे.

आमच्या शेजारी कांबळी राहत. हे कांबळीकाका म्हणजे आम्हा साऱ्यांना मोठ्या भावाप्रमाणे होते. सतत त्यांची विचारपूस असे. असा आनंदी, उत्साही, दिलदार, प्रेमळ, दुसऱ्यांची काळजी घेणारा माणूस मी तरी आजपर्यंत पाहिलेला नाही. आता ते दोघेही या जगात नाहीत, पण शेजार म्हटला की कसा असावा हे आमच्या कांबळीकाकांकडून शिकावे. सर्वांनी बोध घ्यावा असे हे आमचे शेजारी. आमच्या कमलला अभ्यासाला मोकळेपणा हवा होता. कांबळीकाका-काकू दोघे नोकरीवर जाणारे. त्यांच्या रूममध्येच कमलचा अभ्यास झाला. माझ्या वन्संचे लग्न ठरले. आमच्या जागा दोनशे स्वेअरफूटांच्या, कुटुंब मोठे व लग्नासाठी सर्व येणारे. अशा वेळी आमचे हे शेजारी कांबळी त्यांच्या परळ येथील आईच्या घरी राहायला गेले. आमच्या हातात घराची किल्ली देऊन. यांतून शिकत गेलो तो परोपकार, दुसऱ्यांसाठी काय व कसे करावे, दुसऱ्यांच्या उपयोगी पडण्याची वृत्ती. कांबळीकाकांमध्ये जी वृत्ती होती ती मी किती घेतली आहे कोणास ठाऊक?

आमची कमल, म्हणजे अशोक जैन याची बहीण, साधू गावाला गेले, त्यांना नाईट ड्युटी असली, गांगल बाहेर गावी गेले की आमच्या घरी वास्तव्याला येई. आम्हाला तिची केवळ सोबत नसे तर ती घरात शिरल्यावर स्वयंपाकघराचा ताबा कसा घेई, सगळ्या गोष्टी स्वतःच कशा हातात घेई ते कळत नसे. आम्हाला प्रश्न विचारायला ती चान्सच देत नसे. हे तिला अजूनही कसे जमते कोणास ठाऊक? आमचे शेजारी कांबळीकाका तशी ही आम्हा मुलींची कमलआत्या. यांच्याजवळचे हे महान गुण अचंबित करणारे आहेत. मोहित करणारे आहेत. आपणही हे गुण घ्यावेत असे नुसतेच धडपडणे होते. मुलींनी कलमआत्याला तुझे हे पदार्थ फारच छान झालेत असे सांगितले की कमलआत्या ते लक्षात ठेवून मी परवा अमुक-तमुक करणार आहे, जेवायला यायचे आहे असे सांगे. मुली हक्काने कमलआत्याकडे जात. पण तो प्रेमळ हक्क आम्हाला मात्र तिच्याबाबतीत कधीच बजावता आला नाही. अशी ही प्रेरणादायी, कष्ट घेणारी, दुसऱ्यांच्या उपयोगी पडणारी, दातृत्व असणारी, प्रेम करणारी, एकोपा जपणारी, एकरूप होणारी माणसे. कांबळीकाका अन् कमलआत्या यांच्या-प्रमाणेच अशी हजारो माणसे आम्हाला या नेहरूनगराने दिली.

आम्ही नेहरूनगरात राहायला आल्यानंतर वर्षभरातच अनेक वाचनवेड्या लोकांची ओळख झाली. त्यांतूनच 'वाचन-वृंद' सुरू केला गेला. प्रत्येकाने काही रक्कम काढून त्यातून पुस्तके आणली गेली. ती प्रत्येकाने आलटून-पालटून वाचायची. वर्षाच्या शेवटी ती प्रत्येकाला वाटली जायची. वाचन-वृंद भांडण न होता, प्रत्येकाच्या नवनवीन व्यवधानांमुळे बंद करावा लागला.

सुधीर नांदगावकर हे सिनेमा अन् त्याच्या क्षेत्राचे चाहते. ते आमच्या घरी यायचे ते त्यावर चर्चा करण्यासाठी. गांगल अन् ते अनेकदा बसून, चर्चा करत त्यातून 'प्रभात चित्र मंडळा'ची स्थापना केली गेली. आज प्रभात चित्र मंडळ नावजले आहे. आमचे मित्र नांदगावकर हेही मोठे झाले आहेत.

या गोष्टींनंतर परत आमच्या घरात चर्चा सुरू झाल्या. मला वाटते, तरुणपणी अंगात जोम, उत्साह, इर्षा, जिद्द असली अन् तसेच मित्र आजूबाजूला असले की मनातील इच्छा, आकांक्षा यांना उधाण येते. त्या मूर्तरूप धारण करू शकतात. तसेच झाले. के. डी. नाईक, जगन फडणीस, अशोक जैन, कुमार केतकर, संजीव खांडेकर, शेखर साठे, दिनकर गांगल, प्र. ना. परांजपे, अरुण साधू असे अनेक एकाच ध्येयाने पछाडलेले, एकाच गोष्टीसाठी झटणारे, एकच स्वप्न उराशी बाळगणारे, एकत्रित आले, चर्चा घडल्या, आपण सगळेच नोकरदार; आपल्याला मोबदला नको, फक्त पुस्तके स्वस्तात वाचायला मिळालीच पाहिजेत, पुस्तकांचा तेवढा खर्च निघाला की बस्स. अशा अनेक मनातल्या बाबी प्रत्यक्षात उतरावयाला निघालेले हे मित्र. यांनी आमच्या घराचा पत्ता ऑफिससाठी गृहीत धरून 'ग्रंथाली'ची स्थापना आमच्या घरात केली. 'ग्रंथाली' हे नाव अशोक जैनने सुचवले. माझ्या घरात अपू-दिपू आणि ग्रंथाली या तिघी हातात हात घालून आनंदाने वाढू लागल्या. मी, सुदेश, साहेबराव चावरे आमच्याच घरात काम करत असू. ग्रंथालीची पहिली ग्रंथयात्रा निघायची होती. प्र. ना. परांजपे पुण्याला स्थायिक होण्यासाठी गेले होते. त्यांची दहा नंबर बिल्डिंगमधील जागा रिकामी होती, त्याच जागेत भारतकुमार राऊत काही वर्षे राहिला होता विजया चौहान हिनेही जागा घेतली, नंतर तेही दुसरीकडे शिफ्ट झाले. रुम ग्रंथालीच्या कामासाठी मोकळी मिळाली ग्रंथालीचे भाग्यच थोर. सगळे मित्र आपापली कामे संपवून आमच्या घरी येत. चहा घेऊन 'दहा नंबरमध्ये' जात. तेथे सगळेच जण सात ते रात्री बारा-एकपर्यंत मान मोडेल अशा जोमाने, उत्साहाने प्रफुल्लपणे, आनंदी वृत्तीने आपल्या दगदगीची पर्वा न करता कामे करत होते. त्या सर्वांचा उत्साह, आनंद, मनोकामना, जोम इतका होता की त्या कामाची दगदग, श्रम त्यांना स्पर्शही करत नसे. अनेकदा चहा-खाणे पाठवावे लागे. सुदेशाची आईसुद्धा चहा-खाणे सतत देत असे. आम्हाला या चहा-खाण्याचा किंवा या मित्रांच्या कामाचा त्रास होतच नसे याचे कारण

म्हणजे प्रचंड उत्साहात जो-तो डुंबला गेला होता. कुठच्यातरी इर्ष्येने भारला गेला होता. त्याच उत्साहात आम्हीही न्हाऊन निघत होतो. त्या सर्वांचे काम, त्यांची मेहनत, त्यांचे श्रम, दुसऱ्यांना दिसत होते पण ते सर्व मात्र एक प्रचंड ताकदीने व्यापून गेले होते. त्यांचा आनंद ओसंडून वाहत होता. रोज या सर्वांच्या डोक्यातून नवनवीन आयडिया निघत अन् त्या आवडीने ते पुऱ्याही करत. त्यांचा हा आनंद, त्यांचे हे उधाण, त्यांची जिद्द अन् त्यासाठी घेत होते ते श्रम पाहून आम्ही त्यांच्या बायकाही त्या गंगेत न्हाऊन निघत होतो. त्यांचे तरुणपण अन् त्यांच्या एकरुपतेचा प्रचंड जोश यांत आम्हीही बुडून गेलो होतो.

गांगल पत्रकार आहेत हे आता आमच्या भोवतालच्या इमारतीतून सर्वांनाच माहीत झाले होते. एस.एस.सी.चा निकाल आदल्या दिवशी वृत्तपत्रांच्या ऑफिसमध्ये येतो हे सर्वांना ठाऊक होते. रिझल्टच्या आधी चार दिवस आमच्या घरी कॉलनीतल्या अनेक जणी येत अन् आपल्या पाल्यांचा नंबर देत असत. रिझल्टच्या आदल्या दिवशी अकरापासून आमचे घर पूर्णपणे भरून जात असे. वृत्तपत्र कार्यालयात त्या दिवशी फोन घेतच नसत. त्यामुळे 'हे' बजावीत की मीच फोन करेन. मी एक यादी त्यांच्याजवळ देई अन् एक यादी माझ्याजवळ असे. फोन वाजला की सर्व स्त्रिया-मुले फोनजवळ घोळका करत. या क्षणाला महत्त्व असे. कोणाचा रिझल्ट, कसा लागला, मार्कस् किती पडले, याचा त्यांच्या चेहऱ्यावरील भाव, उत्सुकता शिगेला पोचत असे. मुलींचे पाय थरथरत असत. आया भयभीत होत. एकदा रिझल्ट कळला की त्या माय-लेकरांच्या आनंदाला उधाण येई. त्यावेळी आनंदाने भरलेले घर, ती उत्कंठा, तो आनंद आजही विसरता येत नाही.

याचप्रमाणे आमच्या घरी दिवाळी अंकही भरपूर असणार हे आमच्या परिसरात ठाऊक झाले होते. अनेकजण या दिवाळी अंकांचा लाभ घेत असत. आमच्या समोरच्या इमारतीत राहणाऱ्या दाबकेआजी चार दिवसांनी येऊन 'अग, अनुराधा हे दोन अंक वाचून झालेत आता दुसरे दोन अंक नेते' असे म्हणून सर्व अंक वाचून काढत. आपली पुस्तके एकावर एक नुसती रचली जात नाहीत, कोणीतरी ती छान वाचत आहेत याचा आम्हा सर्वांनाच आनंद वाटत असे.

आमच्याच इमारतीत वरील मजल्यावर एक बारावी पास झालेला मुलगा होता. तो सकाळी सात वाजता दार ठोठावी अन् काका टाईम्स देता का? म्हणे. हे त्याला टाइम्स देऊनही टाकीत. एखाद वेळेस आमच्या मुलींना पेपर पाहिजे असेल तरी तो मिळत नसे. आम्ही चौघे कधीच त्याविषयी बोललो नाही हे अगदी खरे आहे. मला वाटते, माणूस वयाने मोठा झाला की त्याच्या अंगी स्पष्टपणा, कणखरपणा, धाडस, उमदेपणा असे गुण येतात. त्या वेळेस मुळूमुळू रडणारी मी माझ्या या बासष्टाव्या वर्षी त्याला म्हणाले असते अरे, तुझे वाचून झाले की पेपर आणून दे बरं का!

ग्रंथालीचे काम हेच होते की वाचनाचे वेड वाढावे, सर्वदूरपर्यंत पुस्तके प्रत्येकाच्या हातात पोचावीत. हे काम केलेही अगदी निर्मळ मनाने, सद्सद्विवेक बुद्धीला स्मरून गांगल ग्रंथालीचे काम करत होते अन् आम्ही कुटुंबीय आनंदीत होत होतो.

पूर्वी सर्वांना 'याचे फायदे-तोटे सांगा' असा शालेय अभ्यासात एक प्रश्न असे.

'ग्रंथाली'मुळे आमच्या घरी अनेक थोर थोर व्यक्ती आल्या. त्या आमच्या कुटुंबातीलच एक होऊन गेल्या. एवढ्या महान व्यक्ती आपल्याच घरातील आहेत हे पाहून धन्य होऊन जायला होई.

---

**– अनुराधा गांगल**
ए-३, अजिंक्यतारा,
सी.एस.टी. रोड, चेंबूर,
मुंबई - ४०० ०७१


# वाचकदिन

**शुक्रवार, २५ डिसेंबर**
**सायंकाळी ४.३० ते रात्रौ ९**
कीर्ती महाविद्यालय,
प्रभादेवी, दादर (पश्चिम).

## दिनकर गांगल यांचा सत्तरीनिमित्त सत्कार

गांगल यांच्या कारकिर्दीवर
प्रकाश टाकणाऱ्या
पुस्तकाचे प्रकाशन

## प्रकाशित होणारी पुस्तके

भिडू – **भगवान इंगळे**
उदई – **प्रकाश चव्हाण**

## काव्यसंग्रह

स्त्रीत्वाचा शोध
**अंजली कुलकर्णी**
उरल्यासुरल्या जगण्याचं रिमिक्स
**गोविंद काजरेकर**
या शतकाचा सात-बाराच होईल कोरा
**शंकरराव दिघे**

# परिसंवाद

अवश्य उपस्थित रहावे

दरवर्षीप्रमाणे सहभोजनाचा
आनंद घ्यावा

# सत्यनारायण पूजापरंपरा व वैदिक संस्कृती

## अनुराधा मु. भिडे

२००८ च्या रुची च्या दिवाळी अंकात डॉ. जयंत बापट ह्यांचा 'सत्यनारायण पूजा-हिंदू-मुस्लिम एकात्मतेची कथा' हा लेख वाचनात आला. प्रस्तुत लेखात त्यांनी सत्यनारायण पूजेच्या कालावधीचा, उगमाचा, व्रतकथांचा, व्रतकथेच्या व पूजापरंपरेच्या उद्दिष्टांचा, उपचारविधीचा, पोथीचा आणि पूजेतील आध्यात्मिक गाभा तसेच सत्यनारायण देवाच्या स्वभावाचा विचार केलेला आहे.

मूळ मुद्दा असा, की ह्या व्रतकथा अलिकडील आहेत असे मानल्याने डॉ. बापट यांचा लेख त्यानुसार सरकत गेला. म्हणूनच त्यांच्या लेखाला उत्तर देताना सत्यनारायण पूजेचा उद्देश, व्रतकथांची प्राचीनता, ब्राह्मणांचे पौरोहित्य, सत्यनारायण देवाचे स्वरूप, सत्यनारायण देवाचा स्वभाव, सत्यनारायण पूजापरंपरेचा उगम, तसेच आध्यात्मिक गाभा अशा मुद्यांचा विचार प्रस्तुत लेखात केलेला आहे.

थोडसं सत्यनारायण पूजाव्रताच्या उद्देशाविषयी -

'खुशाल भ्रष्टाचार करा, खोटं वागा, लांडीलबाडी करा आणि पूजा घाला' असे स्वरूप सध्या ह्या व्रताला प्राप्त झालेले असल्याने ही पूजा म्हणजे अंधश्रद्धा असाच समज सर्वत्र पसरलेला दिसतो.

परंतु हे व्रत 'कलीकलुषविनाशम्' म्हणजे कलहाच्या काळात लागलेला आचारहीनतेचा दोष नाहीसा करणारे आहे असे महर्षी व्यासप्रणितम् भविष्यमहापुराणम्-मध्ये सांगितले आहे.

जी व्यक्ती आचारहीनच आहे त्या व्यक्तीचे पाप नष्ट करण्यासाठी हे व्रत नाही. तर ज्या साधूव्यक्तीला, सज्जन-व्यक्तीला आचारहीनतेचा दोष लागलेला आहे तो दोष ह्या व्रताने नाहीसा होईल असा दिलासा हे व्रत देते असे जाणवते. अशा आचारहीनतेचा दोष लागलेल्या व्यक्तीने कसे वागावे हा 'स्वकर्माचा बोध' देणे, साधूव्यक्तींना आचारणाचे नियम सांगणे हे ह्या व्रतकथांचे उद्दिष्ट आहे असे जाणवते. अर्थात, हे व्रत सामाजिक वास्तवाशी निगडित आहे, मानसशास्त्राशी निगडित आहे. हे एक शास्त्र आहे असे जाणवते. हे व्रत 'परमदुर्लभ' आहे म्हणजे दुर्मीळ आहे असे स्कंदपुराणातील व्रतकथेत सांगितलेले आहे.

येथे अभ्यासासाठी आपण नेहमी वापरतो ती (स्कंदपुराणातील) व्रतकथा न घेता महर्षी व्यासप्रणितम् भविष्यमहापुराणम्मधील व्रतकथा घेतली आहे. 'सत्यदेवा'चे स्वरूप व स्वभावच ह्या पूजा-व्रतकथेचा गाभा वैदिक संस्कृतीत असल्याचे दर्शवते हे प्रतिपादन करणे हा ह्या लेखाचा उद्देश आहे.

सत्यनारायण पूजा व व्रतकथेचा कालावधी विचार -

महाराष्ट्र टाइम्स वृत्तपत्र- 'कहाणी २००६'नुसार - 'आज ज्या स्वरूपात सत्यनारायणाची सार्वजनिक वा घरगुती पूजा केली जाते ती केवळ गेल्या १०० वर्षांतील आहे' असे सांगितलेले आहे.

तुकाराम गाथेत असणाऱ्या अभंगावरून 'सर्व मनोरथ पूर्ण करणाऱ्या सत्यसंकल्पाचा दाता नारायण'ची माहिती संत तुकारामांना होती असे दिसते. याचा अर्थ ३०० वर्षांपूर्वीच्या लोकांना सत्यनारायणपूजा माहिति होती असे म्हणावे लागेल. असे असेल तर, सत्यनारायण पूजापरंपरा ३०० वर्षं जुनी ठरते.

'पंजाबातील नामदेव'मध्ये तर श. पु. जोशी सांगतात की 'कित्येक नामदेवसंप्रदायी पंजाबी लोक पौर्णिमेच्या दिवशी सत्यनारायण करतात. रामनवमी, गोकुळाष्टमी, संत नामदेव जन्मदिन-मृत्युदिन हे दिवस उत्सवयुक्त साजरे करतात.' नामदेवसंप्रदायी नसणाऱ्या अन्य पंजाबी लोकांमध्ये ही प्रथा नाही. याचा अर्थ संत नामदेव जेव्हा पंजाबात गेले तेव्हा त्यांच्याबरोबर ह्या प्रथाही पंजाबात गेल्या, असे म्हटले तर ते चूक ठरणार नाही. असे जर असेल तर पंजाबमधील नामदेवसंप्रदायी लोकांच्या हे उत्सव साजरे करण्यावरून ही पूजा ७०० वर्षांची जुनी ठरते.

On Line http://www.slideboom.com/pressntations/4417 SATYANARAYAN POOJA-slide23 वर सत्यनारायणपूजेची माहिती पाहिली असता त्यात दिलेले आहे की "The Brahmins of the Purana period, 300 AD to 1300 AD designed the 'Satyanarayan Pooja and the Katha.' ह्या नुसार सत्यनारायण पूजा व व्रतकथा ७०० ते १७०० वर्षं जुनी ठरते.

तर महर्षी व्यास प्रणीतम् भविष्य-महापुराणम्मधील प्रतिसर्ग पर्वात असलेले सत्यनारायण पूजा व व्रतकथेचे अस्तित्व ही पूजापरंपरा व व्रतकथा प्राचीन ठरवते. प्रतिसर्ग पर्वात २४ ते २९ अध्यायांमध्ये ही षडाध्यायी व्रतकथा आहे. हे पुराण म्हणजे महर्षी व्यासांनी संकलित केलेल्या १८ पुराणांपैकी. ज्याचा काळ महाभारत युद्धाचा काळ ठरतो. डॉ. प. वि. वर्तक ह्यांनी महाभारतीय युद्धाचे वर्ष इ. स. पूर्व ५५६१

हे महाभारतातील ज्योतिषीय उल्लेखांवरून निश्चित केले आहे. तात्पर्य, सत्यनारायण हा महर्षी व्यासकालीन आहे असे म्हणावे लागेल. ज्याची प्रचीती ह्या व्रतकथेतील अनेक उल्लेखांवरून येते. जसे - सूत, मागध, बंदिजन; भृशुंडी, क्षेपणी, परीघ ही आयुधे; रथ, हत्ती, दासदासी ह्यांचे दान किंवा मुद्रा, निष्क यांचे उल्लेख; तापस, पुरोधस असे उल्लेख ह्या षडाध्यायी व्रतकथेचे प्राचीनत्व दर्शवतात. त्यामुळे अलिकडच्या ब्राह्मणांनी हे प्राचीन उल्लेख मुद्दाम घुसडून कथेला प्राचीनत्व देण्याचा प्रयत्न केला आहे असे म्हणणे अन्यायकारक होईल.

'प्रशस्त यज्ञस्थानं'चा उल्लेख तसेच 'प्रचाचार ततो लोके सत्यनारायणार्चनम्' म्हणजे 'तेव्हा हे व्रत लोकांमध्ये प्रचलीत झाले' असे भविष्यमहापुराणम्मधील विधान, ही पूजापरंपरा त्या काळी होती असेच दर्शवते. याचा अर्थ ही पूजापरंपरा प्राचीन काळी होती व काही कारणाने ती खंडित झाली असेच म्हणावे लागेल.

सत्यविनायकव्रतकथा व सत्य-नारायणव्रतकथा समकालीन -

सत्यविनायकव्रतकथेमध्ये पहिल्या अध्यायात, ३९ आणि ४० व्या श्लोकांत गर्गमुनींचा उल्लेख आहे. हे व्रत करायला श्रीकृष्णांचे कुलाचार्य गर्गमुनी येतात. 'त्याच्याकडून तू हे व्रत समजावून घे' असे श्रीकृष्ण सुदामाला सांगतात. त्याचप्रमाणे शुक्रमुनींचाही उल्लेख आहे. राजा चित्रबाहू फिरत असताना शुक्राचार्यांच्या आश्रमात पोहोचला असा ह्या व्रतकथेत तिसऱ्या अध्यायात, २७ व्या श्लोकात उल्लेख आहे. ह्याचा अर्थ सत्यविनायकव्रत गर्गमुनी व शुक्राचार्य ह्यांच्या काळातील होय. ह्या व्रतकथा जरी 'संदेशबोध कथा' मानल्या तरी गर्गमुनी व शुक्राचार्य हे दोघेही महर्षी, महर्षी व्यासकालीन होत. अर्थात, सत्यविनायक पूजाव्रत व व्रतकथा ह्या महर्षी व्यासकालीन अर्थात महाभारतकालीन ठरतात.

आपण जी पोथी नेहमी वापरतो ती कथा स्कंदपुराणातून घेतलेली आहे. त्यात पाचव्या अध्यायात तुंगध्वज राजाची कथा आहे. (ही कथा म.व्या.प्र. भविष्य महापुराणम्मध्ये नाही.) ह्याच्या गुजराथी व हिंदी भाषेतील पोथीत शेवटच्या ५-६ श्लोकांतून सांगितलेले आहे. 'महान प्रज्ञासम्पन्न शतानन्द नाम के ब्राह्मण सत्यनारायण का व्रत करने के प्रभावसे, दुसरे जन्ममें सुदामा नाम के ब्राह्मण हुए और उस जन्म में भगवान् श्रीकृष्ण का ध्यान कर के उन्होंने मोक्ष प्राप्त किया. येथे ह्या व्रतकथा 'संदेश बोधकथा' आहेत असे म्हणावे लागेल. तर शतानंद व सुदामा हे अनुक्रमे सत्यनारायण व सत्यविनायक व्रतकथांतील ब्राह्मण ह्या 'संदेश बोधव्यक्ती' आहेत असे मानले तरी शतानंदच्यानंतर सुदामा असल्याने आणि सत्यविनायक व्रतकथा ही गर्गमुनी व शुक्रमुनींच्या काळातील असल्याने सत्यनारायण, हा त्यापूर्वीचा ठरतो किंवा समकालीन ठरतो. अर्थात सत्यनारायण हा महर्षी व्यास कालीन अर्थात महाभारत-कालीन आहे असेच म्हणावे लागेल.

ब्राह्मणांचे पौरोहित्य

डॉ. बापटांच्या ब्राह्मणांच्या पौरोहित्याचा मुद्दा काही अंशाने मान्य करावा लागेल. सत्यनारायणपूजेचा सविस्तर आणि विस्तृत असा पूजाविधी अलीकडच्या कुणातरी ब्राह्मणाने तयार केला हे संभवनीय आहे. हा पंचोपचारपूजा विधी महर्षी व्यासप्रणितम् भविष्य महापुराणम्मध्येसुद्धा प्रत्येक अध्यायात दिलेला आहे, पण थोडक्यात दिलेला आहे. आपण सध्या वापरतो त्या पोथीतील- गणेशपूजा, वरुणपूजा वगैरे विस्तृत पूजाविधी नंतरच्या काळात म्हणजे अलिकडच्या काहीशे वर्षांमध्ये तयार केला गेला असावा असे वाटते.

परंतु तेवढ्यावरून सत्यनारायण अलिकडचा ठरत नाही किंवा ह्या व्रतकथाही अलिकडच्या ठरत नाहीत. 'ब्राह्मणांचे पौरोहित्य हे एक उपजीविकेचे साधन' ह्या दृष्टीने विचार केल्यास विस्तृत पूजाविधी अलिकडचा ठरेल, पण व्रतकथा नाही किंवा सत्यनारायणही नाही अलिकडचा ठरणार.

आता सत्यनारायण देवाचे स्वरूप पाहू.

सत्यनारायण देवाचे 'भविष्य-महापुराणम्'मध्ये सांगितलेले स्वरूपच हा 'सत्यनारायण देव' वैदिक आहे हे सिद्ध करते. कारण इस्लामी पंथात 'देव म्हणजे अल्ला वेगळा व मनुष्य वेगळा' असे मानतात.

सत्यनारायणदेवाचे स्वरूप 'बहुरूप: सत्यसन्ध: सर्वव्यापी निरज्जन: ।। असे महर्षी व्यासप्रणितम् भविष्यमहापुराणम्च्या २५व्या अध्यायात सांगितले आहे. यातील प्रत्येक शब्दाचे विस्तृत विवेचन देता येईल. परंतु तूर्तास फक्त सर्वव्यापी व बहुरूपः स्वरूप पाहू.

तत्पूर्वी कलह, विडम्बना ह्या संकल्पना समजावून घेऊ.

कलौ प्रत्यक्ष फलद: सत्यनारायणो विभु: ।। म्हणजे कलहाच्या काळात सत्यनारायण देव हा प्रत्यक्ष फळ देणारा असतो. असे व्यासप्रणित भविष्य-महापुराणम्मध्ये सांगितलेले आहे. कारण 'चतुष्पादो हि धर्मश्च तस्य सत्यं प्रसाधनम् । सत्येन धार्यते लोक: सत्ये ब्रह्म प्रतिष्ठितम् ।। याचा अर्थ सत्य हा धर्माचा अलंकार असतो. सत्याने लोकांना धारण केले जाते. सत्यात ब्रह्म प्रतिष्ठित असते. यावरून असे स्पष्ट होते की कलहाच्या, भांडणाच्या काळात लोकं एकमेकांपासून दुरावलेले असतात ते सत्याने जवळ येतात. कारण सत्य हा धर्माचा अलंकार असतो.

कलहाचा काळ पहाण्यासाठी एका उदाहरणाचा विचार करू.

सतीश काही कारणाने वक्रपाद ह्या मित्राकडे जातो आणि काम झाल्यावर घरी येतो. काही दिवसांनंतर 'क, ड, इ, फ' यांसारखे लोक सतीशबरोबर संशयाने वागू-बोलू लागतात. (विडम्बना - अनुकरण, पीडणे, फजिती, परीक्षा हे सर्व एकत्रित)

विडम्बना म्हणजे? - जसे, 'क' सतीशला सांगतो की 'तुझ्यासारखा कुणी मुलगा वक्रपादाकडे गेला. तेव्हापासून वक्रपादाची सोन्याची साखळी हरवली. आता आम्ही त्या मुलाला गणेशोत्सव मंडळातून कमी करणार. यावर सतीश विचारतो, 'कोण मुलगा?' तेव्हा 'क' सतीशकडे दुर्लक्ष करत हसतहसत तिथून निघून

जातो. नंतर सतीशच्या असे लक्षात येते की त्यालाच गणेशोत्सव मंडळातून वगळले आहे. अशा प्रकारे लोकांकडून सतीशची विडम्बना केली जाते आणि सतीश 'चोरी कबूल करत नाही' ह्या आरोपाखाली लोकांपासून दुरावतो, एकटा पडतो. कारण 'सत्येन धार्यते लोक:' आणि 'धर्मस्य सत्यम् प्रसाधनम्।'

आता सत्यनारायण देवाचे सर्वव्यापी स्वरूप पाहू - क, ड, इ, फ यांसारखे लोक जे सतीशची विडम्बना करतात त्या सर्वांच्या हृदयात हा सत्यनारायण देव अंशानी वास करून असतो. आणि त्यांच्या रूपातून सत्यनारायणदेवच सतीशची परीक्षा घेत असतो. अशाप्रकारे सत्यनारायण देव हा 'सर्वव्यापी' असतो.

आता सत्यनारायण देवाचे बहुरुपः स्वरूप पाहू -

वर क ही व्यक्ती सतीशची विडम्बना कशी करते ते आपण पाहिले. ह्याचप्रमाणे क, ड, इ, फ सारख्या ज्या लोकांच्या मनात संशय आहे असे अनेक लोक विविध मार्गांनी, विविध प्रकारे सतीशची विडम्बना करतात. अशा सर्वांच्या हृदयात अंशानी असणारा सत्यनारायण देवच जणू सतीशची विविध मार्गानी विविध प्रकारे परीक्षा घेत असतो अशाप्रकारे सत्यनारायण देवाचे स्वरूप बहुरुपः असे असते.

सत्यनारायण देवाचा स्वभाव-

सत्यनारायण देवाची पूजा विसरलात तर सत्यनारायण देव क्रुद्ध होतो. धनसंपत्तीचे हरण केले जाते आणि सत्यनारायणाच्या पूजनाने धनसंपत्ती मिळते असा सत्यनारायध देवाचा स्वभाव आहे.

लेखविस्तार टाळण्यासाठी ह्या स्वभावातील तथ्य आता येथे पडताळून पहायचे नाहीये. परंतु सत्यनारायण देवाचा हा स्वभाव सामाजिक वास्तवाशी आणि मानशशास्त्राशी निगडित आहे हे विवेचनासह दाखवता येईल.

सत्यनारायण व सत्यविनायक ह्यांच्या स्वभावातील साम्य -

सत्यविनायकाचे उपाख्यान श्री ब्रह्मांडपुराणात आहे हे 'इति श्री ब्रह्मांडपुराणे शिवपार्वती संवादे सत्यविनायकोपास्याने पंचमोध्याय: ।।' ह्यावरून समजते.

ह्या व्रतकथेतील तिसऱ्या अध्यायातील २६ व्या, २७ व्या श्लोकांवरून तसेच ५व्या अध्यायातील १९ व २० व्या श्लोकांवरून सत्यविनायकाचा स्वभाव स्पष्ट होतो.

अध्याय ३ रा- 'आणि आनंदल्या-भरात सत्यविनायकाला विसरला, थोडे दिवस गेल्यावर त्याच्यावर विघ्ने येऊन कोसळली. थोड्या अपराधावरून राजाने त्याचे सर्वस्व हरण करून त्याला नगराबाहेर घालवून दिले ।।२६,२७।।

अध्याय ५ वा - 'परंतु प्रसादाचा अपमान व देवभक्त साध्वीचा छळ यामुळे त्याच रात्री तिच्या सर्वांगाला कुष्ठ उत्पन्न झाले' ।।१९।। 'हे वराननने, प्रसादाच्या अपमानामुळेच तुला हे दुःख भोगावे लागले.' ।।२६।।

येथे 'सत्यविनायकाला विसरला तर विघ्ने कोसळली' किंवा 'प्रसादाच्या अपमानामुळे कुष्ठ उत्पन्न झाले, दुःख भोगावे लागले' यातील तथ्य शोधणे, किंवा हे कसे शक्य आहे? असा ऊहापोह करणे किंवा खरेच त्यातून काही संदेशबोध दिलेला आहे का? हा आपल्या लेखाचा उद्देश नाही. परंतु सत्यनारायण देवाचा स्वभाव व सत्यविनायक देवाचा स्वभाव यात साम्य मात्र आहे.

अर्थात डॉ. बापट यांनी त्यांच्या लेखात लिहिलेला मुद्दा - 'पण बहुतेक देव त्याची कायमची पूजा केली नाही तर रागावून तुमच्या धनसंपत्तीचे आणि प्रसंगी प्राणांचेही अपहरण करणे अशक्य. हिंदू दैवतांचा तो पिंड नव्हे.' (रुची दिवाळी २००८, पान १८) हा चुकीचा ठरतो.

तसेच, पुढे डॉ. बापट लिहितात- 'इस्लाम'मध्ये मात्र देवाला विसरलात तर त्याचा क्रोध पत्करावा लागेल. तेव्हा देवाच्या स्वभावातील आमूलाग्र बदलाचा हा हिंदूंनी इस्लामकडून घेतलेला वारसा.' (रुची दिवाळी २००८, पान १८) हा मुद्दाही चुकीचा ठरतो कारण सत्यविनायक पूजा-व्रतकथा व सत्यनारायणपूजा-व्रतकथा ह्या महर्षी व्यासकालीन ठरतात हे आपण याआधी पाहिले. अर्थात, जेव्हा इस्लाम पंथ निर्माणही झालेला नव्हता तेव्हापासूनचा हा सत्यनारायण देवाचा स्वभाव आहे.

सत्यनारायण पूजापरंपरेचा उगम

महर्षी व्यासप्रणितम् भविष्य-महापुराणम्मध्ये प्रत्येक अध्यायात ह्या पूजेचा पंचोपचार विधी थोडक्यात सांगितलेला आहे आणि इस्लाम पंथाचा जन्म इसवी सनाच्या सातव्या शतकातला. अर्थात, सत्यनारायण पूजापरंपरेचा उगम इस्लामीपंथात असूच शकत नाही.

काही संशोधकांचे मत असे आहे की सत्यनारायण पूजा बंगाल व ओरिसा भागात प्रचलित असलेल्या सत्यपीर पूजेवरून आली आणि ही सत्यपीर पूजा गेली ४०० वर्षे ओरिसा व बंगाल मध्ये आहे. (रुची दिवाळी २००८, पान १७) परंतु महर्षी व्यासकालीन असलेली पंचोपचार पूजा म्हणूनच ४०० वर्षांपासून चालू असलेल्या सत्यपीर पूजेवरून आली असे म्हणणे चुकीचेच ठरेल.

'During the 8th and 9th century A.D. a new emphasis began to develop within religion of Islam ' असे सूफीपंथाबाबत 'The mystical Slide of Islam'मध्ये सांगितलेले आहे. अर्थात, सूफी पंथ हा आठव्या-नवव्या शतकात निर्माण झाला. महर्षी व्यासकालीन सत्यनारायणाची पंचोपचार पूजा ही सूफी पंथाच्याही पूर्वीपासून असल्याने सत्यनारायणाचे रूपांतर सत्यपीरमध्ये होऊन 'हिंदू-मूस्लिम ऐक्य घडले' असे म्हणावे लागेल आणि डॉ. बापट यांचे 'हिंदू-मुस्लिम ऐक्य' हे म्हणणे अशाप्रकारे बरोबर आहे असे म्हणावे लागेल.

परंतु सत्यपीर पूजेला स्कंदपुराणात, भविष्यपुराणात अंतर्भूत केले गेले व त्यामुळे त्या पूजेस हिंदू धर्मात अधिकृत स्वरूप निर्माण झाले हे डॉ. बापटांचे म्हणणेही चुकीचे ठरते कारण भविष्यमहापुराणम्मध्ये प्रत्येक अध्यायात थोडक्यात का असेना पण सत्यनारायणपूजेचा पंचोपचार पूजाविषयी दिलेला आहे.

तात्पर्य, केवळ 'पीर' एवढ्या शब्दा-

वरून ‘सत्यपीराचे रूपांतर सत्यनारायणात होऊन त्याचे संपूर्ण हिंदूकरण झाले’ हे डॉ. बापटांचे म्हणणे चुकीचे ठरते. कारण सत्यपीर हा अलिकडच्या ४०० वर्षांतला आहे पण सत्यनारायण प्राचीन आहे.

महर्षी व्यासप्रणितम भविष्य-महापुराणम्मध्ये प्रतिसर्गपर्वात असलेल्या सत्यनारायणाच्या पंचोपचार पूजाविधीवरून ह्या पूजापरंपरेचा उगम वैदिक संस्कृतीत आहे असेच स्पष्ट होते.

अशा प्रकारे सत्यनारायण पूजेचा विस्तृत पूजाविधी अलिकडचा असला तरी ह्या पूजेची व्रतकथा महर्षी व्यासकालीन ठरते. ह्या व्रताचा उगम सातव्या शतकात जन्माला आलेल्या इस्लामी पंथात असू शकत नाही.

सूफी पंथ नवव्या शतकापासून असल्याने सत्यनारायणाचे रूपांतर सत्यपीरमध्ये झाले असणे संभवनीय आहे. हिंदू आणि सुफी अशा दोन धर्मांच्या मिलाफाने या पीराचे नाव व पूजा निर्माण झाली हे डॉ. बापट ह्यांचे म्हणणे अशा प्रकारे बरोबर ठरते. परंतु ह्या पूजेला पुराणांत अंतर्भूत केले हे मात्र चूक.

त्याचप्रमाणे, सत्यनारायण देवाचा स्वभाव हा हिंदूदैवतांचा पिंड नाही असे म्हणणेही चूक ठरेल कारण महर्षी व्यासकालीन असलेल्या सत्यविनायक देवाचाही स्वभाव असाच आहे. देवाच्या स्वभावात बदल झाला असे म्हणणेही चूक ठरते.

सत्यनारायण व्रतकथेचे महर्षी व्यासप्रणितम् भविष्यमहापुराणम्मधील अस्तित्व, ह्या संस्कृतव्रतकथेत प्रत्येक अध्यायात असलेला पंचोपचार पूजाविधी, सत्यनारायण देवाचा स्वभाव आणि सत्यनारायण देवाचे सर्वव्यापी स्वरूप यातून ह्या पूजापरंपरेचे मूळ वैदिक संस्कृतीत आहे हेच सिद्ध करते.

---

**– अनुराधा मु. भिडे**
सावली, ब्राह्मण आळी,
पापडी, वसई, जि. ठाणे.
दूरध्वनी : (०२५०) २३२४३२१

## प्रकाशन समारंभ : वन फॉर सॉरो – अनुराधा कुलकर्णी

‘ग्रंथाली’ने प्रकाशित केलेल्या वीरपत्नी अनुराधा कुलकर्णी लिखित ‘वन फॉर सॉरो’ या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा २ नोव्हेंबर, २००९ रोजी ओशिवरा, अंधेरी येथे लेखिकेच्या राहत्या घराजवळील पटांगणात, आप्तस्वकीय, स्नेही व काही ठरावीक उपस्थितांच्या उपस्थितीत पार पडला. प्रमुख अतिथी म्हणून वीरमाता अनुराधा गोरे उपस्थित होत्या. पुस्तकाला समर्पक प्रस्तावना देणारे, ज्येष्ठ साहित्यिक पद्मश्री मधु मंगेश कर्णिक यांची उपस्थिती विशेष लक्षणीय होती.

कार्यक्रमाची सुरुवात गणेशस्तवनाने झाली. लेखिकेच्या महाविद्यालयीन जीवनापासूनच्या स्नेही सौ. सुहासिनी चित्रे यांनी मनोगत व्यक्त केलं. भूतकाळातील अनेक समृद्ध आठवणींचा मागोवा घेतला. त्यात अनुराधा कुलकर्णी यांच्या सुखसंपन्न दिवसांपासून आतापर्यंतच्या खडतर जीवनप्रवासाची रुपरेषा उलगडली.

विश्वास कुलकर्णी व वैशाली कुलकर्णी या लेखिकेच्या दोन मुलांचं आपल्या आईबद्दल असणारं प्रेम, त्या दोघांच्याही भाषणातून दिसलं. आईविषयी कृतज्ञभाव व्यक्त करून, या दोन्ही मुलांनी आईला शुभेच्छा दिल्या.

त्यानंतर अनुराधा गोरे यांच्या हस्ते ‘वन फॉर सॉरो’ या पुस्तकाचं प्रकाशन झालं. प्रकाशनसमयी केलेल्या भाषणांत, अनुराधा गोरे यांनी लेखिकेच्या कष्टप्रद जीवनप्रवासाचा उल्लेख करून त्या म्हणाल्या, अत्यंत तरल आणि भावस्पर्शी लेखनशैली असणाऱ्या अनुराधा कुलकर्णी यांच्या या पुस्तकालीत सर्वच लेख वाचनीय आहेत. अत्यंत संवेदनशील आणि हळव्या मनाच्या या लेखिकेची भाषा देखील उत्कट भावानुभव व्यक्त करते. हे लेखन कुणाचा राग किंवा द्वेष करत नाही. आपुलकीनं व प्रेमानं बांधलेल्या ऋणानुबंधाच्या आठवणींचा तो कोष आहे. त्यात सुख आहे, असीम त्यागाचं दुःखदेखील आहे. वेदना आहेत, समाज-व्यवस्थेबाबत, या समाजातील संवेदनांबाबत प्रश्न आहेत परंतु त्यांचा कुणावरही रोष नाही.

मधु मंगेश कर्णिक यांनी आपल्या भाषणात लेखिकेला शुभेच्छा दिल्या. लेखिकेच्या लालित्यपूर्ण लेखनशैलीचा पुस्तकातील वावर पाहून त्यांनी लेखिकेच्या समृद्ध कवीमनाला दाद दिली. यापुढे लेखिकेनं स्वतःच्या उत्कृष्ट कवितांचा काव्यसंग्रह प्रसिद्ध करावा असं सुचवलं. या पुस्तकाला प्रस्तावना लिहण्याचं भाग्य आपल्याला लाभलं यासाठी त्यांनी लेखिकेचे आभार मानले.

लेखिका अनुराधा कुलकर्णी मनोगत व्यक्त करताना अतिशय भावुक झाल्या. आपल्या खडतर जीवनप्रवासात मायेची सावली देणाऱ्या सर्वांचे त्यांनी आभार मानले. उपस्थित सर्व आप्तस्वकीय आणि जुने ऋणानुबंध असणाऱ्या सर्वांना पाहून लेखिका भारावून गेल्या तसेच आपल्या भाषणातून त्यांनी आपल्या दोन्ही मुलांविषयी समाधान व्यक्त केलं. ‘दोन्ही मुलांनी मला जीवापाड जपलं. माझी सर्व स्वप्नं पूर्ण केली आणि माझ्या कष्टाचं सार्थक झालं’’ असं त्या समाधानानं म्हणाल्या.

एका वीरपत्नीनं लष्करी जीवनप्रवासातील स्वानुभवांवर लिहिलेल्या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्याला एका वीरमातेनं उपस्थित राहणं हा अपूर्व योग होता.

प्रश्नाच्या मुळापासून उत्तराच्या गाभाऱ्यापर्यंत जाणारा लेखिकेचा हा प्रमाणिक जीवनप्रवास स्त्रीमनाचे विविध पैलू उलगडून दाखवतो. हे पुस्तक फक्त एका लष्करी अधिकाऱ्याच्या पत्नीची मनोव्यथाच सांगत नाही तर अनेक सामाजिक प्रश्नांना आव्हान देतं.

हे पुस्तक तरुणांसाठी नक्कीच प्रेरणादायी आहे. वाचकांनी जरूर हे वाचावं आणि मोठ्या प्रमाणात स्वीकारावं यातच लेखिकेचा लिहिण्याचा आणि ग्रंथालीचा हेतू सार्थ ठरेल.

**– उन्मेश झगडे**



डॉ. अनिल काकोडकर

# ‘फुलाला सुगंध मातीचा’ पुस्तकाचे प्रकाशन




ॲड. उज्ज्वल निकम

‘फुलाला सुगंध मातीचा’ या डॉ. अंजली कुलकर्णी व डॉ. अनुराधा हरकरे लिखित पुस्तकाचा प्रकाशनसोहळा ७ नोव्हेंबर २००९ रोजी, दादर येथील ठाकूर सभागृहात डॉ. स्नेहलता देशमुख यांच्या हस्ते संपन्न झाला.

या पुस्तकात वेगवेगळ्या वयाच्या, वेगवेगळ्या क्षेत्रांतील आपापल्या जागी श्रेष्ठ असणाऱ्या पाच व्यक्ती व त्यांच्या यशामध्ये असलेला त्यांच्या पालकांचा सहभाग याचा मागोवा घेण्यात आला आहे.

पुस्तकामागचे आशयसूत्र विशद करताना डॉ. अंजली कुलकर्णी यांनी, ‘यशस्वी व्यक्तींच्या यशात त्यांच्या कुटुंबाचा सहभागपण तेवढाच मोठा असतो’ हे नमूद केले. मुलं घडवणं ही मोठी जबाबदारी आहे हे जाणवल्यामुळेच सुजाण पालकत्वाचा शोध घेण्याच्या निमित्तानं पाच प्रभावी व्यक्तिमत्त्वं व त्यांचे कौटुंबिक नातेसंबंध याचं चित्रण या पुस्तकात केल्याचं त्यांनी सांगितलं. या पाच व्यक्ती म्हणजे डॉ. अनिल काकोडकर, ॲड. उज्ज्वल निकम, सचिन तेंडुलकर, श्रेया घोषाल व मृणाल कुलकर्णी. प्रकाशन सोहळ्यास यांपैकी सचिन तेंडुलकर यांच्या वतीनं त्यांचे ज्येष्ठ बंधू नितीन तेंडुलकर उपस्थित होते तर इतर चारही व्यक्ती आपापल्या कुटुंबासोबत आवर्जून हजर होत्या.

कार्यक्रमाच्या पूर्वार्धात डॉ. काकोडकर, ॲड. निकम व डॉ. स्नेहलता देशमुख यांनी सभागृहाला संबोधित केले तर कार्यक्रमाच्या उत्तरार्धात प्रा. लतिका भानुशाली व डॉ. अनुराधा हरकरे यांनी उपस्थित मान्यवरांशी संवाद साधला.

‘‘मनुष्य हा इतर प्राण्यांपेक्षा वेगळा आहे तो त्याच्या विचारक्षमतेमुळे. नवीन विचार समाजात निर्माण होणं हे उत्क्रांतीचं लक्षण आहे. म्हणूनच या पुस्तकाच्या निमित्तानं झालेला विचार महत्त्वाचा आहे’’ असं प्रतिपादन डॉ. अनिल काकोडकर यांनी केलं.

‘‘माझं काम मी चांगलं व प्रामाणिकपणे करतो आहे याची मान्यता या पुस्तकामुळे मिळाली’’ असं मत ॲड. उज्ज्वल निकम यांनी मांडलं. शेरोशायऱ्या यांचा वापर करत अत्यंत मिश्कील शब्दात ॲड. निकम यांनी आपल्या यशाचं श्रेय पत्नी व इतर कुटुंबीय यांना दिलं. समाजात गुन्हे घडू नयेत म्हणून सामान्य माणसानंदेखील पोलिसाची भूमिका पार पाडावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

आपल्या अध्यक्षीय भाषणात युवक उपस्थितीची विशेष दखल डॉ. स्नेहलता देशमुख यांनी घेतली. त्यासाठी त्यांनी ग.दि. माडगूळकर यांच्या ‘‘युवक हो विश्व उद्याचे तुमचे, जे जे अमुचे ते ते होवो तुमच्या उपयोगाचे’’ या ओळी उद्धृत केल्या. स्त्री ही शक्ती असते, ती नदीसारखा प्रवाह बदलून का होईना आपले ईप्सित गाठतेच. हेच स्त्रियांच्या यशाचे इंगित आहे यावर त्यांनी विशेष भर दिला. या पुस्तकाच्या निमित्तानं स्त्रीचं विशेषत: मातेचे मुलांच्या जडणघडणीत असलेलं महत्त्व वादातीत आहे हे स्पष्ट होतं असं सांगून त्या म्हणाल्या, की आईरूपी स्त्री ही एखाद्या पणतीसारखी असते. स्वत: तापून म्हणजेच दु:ख, कष्ट सहन करून ती आपल्या मुलांत ज्ञानाची ज्योत तेवत ठेवते.

‘ग्रंथाली’चे विशेष कौतुक करून त्या म्हणाल्या, की शक्ती, भक्ती व युक्ती यांचा संगम म्हणजे ‘ग्रंथाली’. ‘ग्रंथाली’ची वाचकांवर भक्ती आहे. समाजाला उपयोगी पडेल असे साहित्य देण्याची युक्ती त्यांच्याकडे आहे व नवीन विचारांची शक्ती त्यांच्याकडे आहे.

सचिन तेंडुलकर यांच्या वतीनं त्यांचे ज्येष्ठ बंधू नितीन तेंडुलकर यांनी सचिनचे ‘बाबा’ या भूमिकेतील रूप विशद केलं. स्वत:च्या आदर्श वागणुकीतून आपल्या मुलांवर त्यांनी कशाप्रकारे संस्कार केलं याचं वर्णन केलं.

अणुऊर्जा करारानंतर वीज निर्मितीला



डॉ. स्नेहलता देशमुख



मृणाल कुलकर्णी



श्रेया घोषाल

किती टक्के चालना मिळेल या प्रश्नाला उत्तर देताना डॉ. काकोडकर म्हणाले, की वीज पुरवठा वाढला तरी मागणीपण वाढतच आहे. त्यामुळे येत्या दशकात तरी विजेची स्वयंपूर्णता आपल्याला गाठता येणार नाही. पण त्या दिशेनं प्रयत्न मात्र निश्चितच सुरू आहेत.

संवेदनशील खटले हाताळताना मनाचे संतुलन कसे सांभाळता? याचे उत्तर देताना ॲड. निकम म्हणाले, की कोर्टात आम्ही जिवंत माणसाशी अभिनय करत असतो. इतर वेळी मात्र तणावमुक्तीसाठी वेगवेगळ्या क्लृप्ती स्वीकारतो. कधी लहान मुलांबरोबर मूल होऊन खेळतो, तर कधी जादूचे प्रयोग करून विरंगुळा मिळवण्याचा प्रयत्न करतो. 'हास्य क्लब'मध्ये जात नसलो तरी त्या माणसांचं हसणं पाहून असाच विरंगुळा मिळतो.

मुलांच्या संगोपनाचा प्रश्न हा आजच्या करिअर करणाऱ्या स्त्रीच्या आयुष्यातील सर्वांत मोठा प्रश्न आहे. नोकरी, करिअर व संसार अशी तारेवरची कसरत करणाऱ्या मातांना मुलांसाठी आवश्यक तेवढा वेळ देता येत नाही ही खंत असतेच. पालक व मुलं यांच्यातील दरी कुठेतरी वाढते आहे अशी भीती अभिनेत्री मृणाल कुलकर्णी यांनी व्यक्त केली. आईवडिलांची जागा टी.व्ही.नं घेतली आहे हे योग्य नाही असं सांगून त्या म्हणाल्या, की पालकांनी निदान दिवसातला एक तास तरी आपल्या पाल्याबरोबर संवाद साधणं गरजेचं आहे.

लहान वयात यशाचं शिखर गाठलं पण त्यामुळे बालपणीची निरागसता, खेळणं, हसणं हे मात्र खरोखरच राहून गेलं, अशी खंत आघाडीची पार्श्वगायिका श्रेया घोषाल यांनी व्यक्त केली. लहानपणी या सर्वांचा राग येत असे, पण त्यामुळेच आजचं यश मिळवू शकले याचं श्रेय निश्चितच माझ्या आई-वडिलांकडे जातं असं त्या म्हणाल्या. त्यांनीच माझ्या आवाजातील ताकद ओळखून योग्य संगीताचे शिक्षण दिलं. आज गाण्यातून जो आनंद मिळतो त्याची तुलना कोणत्याच आनंदाशी होऊ शकत नाही असे भावपूर्ण उद्गार त्यांनी काढले.

यशस्वी पुरुषाच्या मागे स्त्री उभी असते, पण यशस्वी स्त्रीच्या मागे एक पुरुष कसा खंबीरपणे उभा राहतो याची रसभरीत कहाणी मृणाल कुलकर्णी यांचे पती ॲड. रुचिर कुलकर्णी यांनी सांगितली. मृणालला मी या क्षेत्रात काम करताना लग्नाआधीही पाहिलं होतं. त्यामुळे तिचं सिनेक्षेत्र व वाहिनीवरील काम हा माझ्यासाठी कल्चरल शॉक नव्हता. उलट, तिच्या या क्षेत्रातील यशासाठी तिला मी नेहमीच प्रोत्साहन दिलं असं म्हणाले.

आय.आय.टी.सारख्या संस्था जर अधिक प्रमाणात निर्माण झाल्या, संशोधनाच्या विपुल संधी आपल्या देशातपण तयार झाल्या तर भारतीय युवक परदेशात



डॉ. अंजली कुलकर्णी



डॉ. अनुराधा हरकरे



प्रा. लतिका भानुशाली

जाणार नाहीत, असे उद्गार डॉ. अनिल काकोडकर यांच्या पत्नी सौ. सुयशा काकोडकर यांनी काढले. तर काकोडकरांच्या मातोश्री कमलाताई यांनी मुलगा कितीही जागतिक स्तरावर पोचला तरी घरात तो माझ्यासाठी माझा मुलगाच असतो असं नमूद करून, तरी त्याच्या व्यग्रतेत आम्ही त्याला त्रास देत नाही, त्याला हवं-नको पाहून मदत करतो असं सांगितलं.

कार्यक्रमाची सांगता श्रेया घोषाल यांच्या सुरेल गायनानं झाली. या पुस्तकाच्या लेखिकांचे वडील डॉ. वऱ्हाडपांडे यांच्या कवितांच्या 'मस्त शारदीय रात' या नावाने प्रसिद्ध आहे. अल्बमधील एक गाणे 'मेंदी भरल्या पाऊली आली पहाट अंगणी' या गीतानं या कार्यक्रमात अधिक रंगत निर्माण केली.

# आम्ही काय 'कमावलं' आणि काय 'गमावलं'?



शारदा साठे, नीलम गोऱ्हे, विद्या बाळ आणि सुनीता धुमाळे

न स्त्री स्वातंत्र्यं अर्हतीच्या जोखडापासून स्त्री मुक्तीपर्यंतच्या आजवरच्या खडतर प्रवासात स्त्रीनं काय कमावलं आणि काय गमावलं याचा लेखाजोखा मांडायचा झाल्यास, तो एका शब्दात सांगता येईल की तिनं 'स्वातंत्र्य' कमावलं आणि 'बेड्या' गमावल्या. ही सुध्दा एक प्रकारची कमाईच आहे. हे सार आहे 'मैत्रीण' मासिकातर्फे आयोजित स्त्री स्वातंत्र्याची पन्नास वर्षं या परिसंवादाचं! हे वर्ष संयुक्त महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेचं सुवर्णमहोत्सवी वर्ष आहे. या काळात आपल्याकडच्या स्त्रीनं काय कमावलं आणि काय गमावलं हे जाणून घेण्याचा प्रयत्न म्हणून या परिसंवादाचं आयोजन 'मैत्रेय परिवार'च्या प्रिय मैत्रीण मासिकातर्फे केलं गेलं होतं. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांच्यातर्फे, 'ग्रंथाली'च्या सहकार्यानं यशवंतराव चव्हाण, यांच्या पंचविसाव्या पुण्यतिथी वर्षानिमित्त आयोजित सामाजिक कार्यक्रमांतर्गत हा परिसंवाद घडला.

अमेरिकेत 'मैत्रीण'हेल्पलाइन चालवणाऱ्या सुनीता धुमाळे, जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या विद्या बाळ, शारदा साठे, आमदार डॉ. नीलम गोऱ्हे यांनी स्त्री स्वातंत्र्याचे अनेक पैलू उलगडून दाखवताना, स्त्रियांच्या सामाजिक स्थानापासून ड्रेस कोडपर्यंत सगळे मुद्दे चर्चेला आणले.

७० साली अनेक स्वप्नं उराशी घेऊन अमेरिकेला गेलेल्या सुनीता धुमाळे सांगतात की अमेरिकन जीवनशैली पाहता तिकडे लग्न करून आलेल्या तरुण मुलींची संवादाची गरज पूर्ण करण्याच्या हेतूनं त्यांनी तिथे 'मैत्रीण' नावाची हेल्पलाइन सुरू केली.

आपल्याकडे मुलींना परदेशात राहणाऱ्या मुलाचं स्थळ आलं की त्याचं शिक्षण, कित्येक हजार डॉलर पगार एवढंच बघितलं जातं. मुलगा आयबीएममध्ये कामाला आहे, त्याला नव्वद हजार डॉलर पगार आहे मात्र त्याचं तिथलं राहणीमान, त्याच्या नोकरीचा संपूर्ण तपशील, असलेली व्यसनं, मित्रमैत्रीणी अशी कुठलीही चौकशी न करता मुलींची लग्न परदेशात करून दिली जातात. मात्र बऱ्याच वेळा त्यांना फसवणुकीचे अनुभव येतात. भारतात असलेल्या त्या मुलांच्या आईवडिलांच्याही लक्षात येत नाही की तिथे जाऊन आपला मुलगा कितपत आणि कसा बदलला आहे. त्यामुळे या मुली, पालक यांचे फोन 'मैत्रीण' हेल्पलाइनकडे येतात. ही फोनलाइन सुरू केल्यावर आतापर्यंत तिथे ४५०० फोन कॉल्स मदतीसाठी आले. यावरून तिथे गेलेल्या भारतीय मुलींची अवस्था काय असेल याची कल्पना येते. मानसिक, शारीरीक छळाचं प्रमाणही इथे जास्त आहे. ही आजच्या काळातही परदेशात लग्न करण्याची स्वप्नं बघणाऱ्या स्त्रियांची परिस्थिती आहे.

आपल्याकडेही परिस्थिती फारशी वेगळी नाही. जेष्ठ पत्रकार आणि समाजकारणी विद्या बाळ सांगतात की देश स्वतंत्र होतो, म्हणजे त्यातली माणसं स्वतंत्र होतातच असं नाही. हीच स्वतंत्र देशातल्या स्त्रियांची परिस्थिती आहे. बदलत्या काळात स्त्रीवरची बंधन सैल तर झालेली आहेत, मात्र ती पूर्णपणे नष्ट झालेली नाहीत. आपल्याकडे स्त्रिया स्वतंत्र नाहीत. पुरुषही स्वतंत्र नाहीत. हुंडाबळी, बलात्कार, स्त्री-भ्रूण हत्या असले प्रकारही वाढत चाललेत. स्त्री-भ्रूणहत्येमुळे स्त्री आणि पुरुषांचं प्रमाण एकमेकांशी व्यस्त होत आहे. यामुळे शासनाला कायदे करावे लागतात. आरक्षणामुळे स्त्रियांच्या परिस्थितीत खूप फरक पडला आहे. ही छोटी छोटी पावलं आपल्या दृष्टीनं फार महत्त्वाची आहेत. मात्र कायद्याच्या वाटेला अनेक लोक जात नाहीत, फार लोकांपर्यंत त्याची माहिती पोचत नाही

ही एक नकारात्मक बाजू आहे. आपल्या ताटात सगळं मांडलं आहे, पण पोटात जात नाही. वास्तविकता अशी आहे की पुरुषी सत्तेला स्त्रिया शहाण्या झालेल्या आवडत नाहीत, या सबलीकरणाचा पुरुषांनी धसका घेतलेला आहे.

शारदा साठेंच्या मते, स्त्रियांनी स्वातंत्र्याचा अर्थ जाणून घेतला पाहिजे. स्त्रियांनी स्वातंत्र्य कमावलं आणि बेड्या गमावल्या. स्त्रियांना हिंसारहित जगण्याचं, नीतिमत्तेचं व्यक्तिस्वातंत्र्य हवं आहे. प्रत्येक स्त्रीसंघटनेचं काम स्त्रियांना स्वातंत्र्य उपभोगू देण्याचं आहे. स्त्रियांना सक्षम बनवणं हे त्यांचं काम आहे. त्यासाठी स्त्रियांनी राजकीय दृष्ट्या सक्षम होण्याची गरज आहे. मात्र हे स्वातंत्र्य दुसऱ्याच्या स्वातंत्र्यावर गदा आणून मिळवता कामा नये. लग्नसंस्था टिकवण्याविषयी शारदा साठे सांगतात की लग्नसंस्था अशी एकादुसऱ्या लग्नामुळे मोडत नसते. तुम्हाला जर लग्न मान्य नसेल तर त्यातून बाहेर पडू शकता, कारण तो तुमचा अधिकार असतो. मात्र दुसरे संबंध निर्माण करण्याआधी पहिले संबंध संपवायला हवेत, अन्यथा ही फसवणूक ठरेल. सुपरवुमन ही संकल्पना मात्र त्यांना मान्य नाही. त्यांच्या मतानुसार प्रत्येकाची क्षमता वेगवेगळी असते. आपण आपल्या क्षमता ओळखून त्या वाढवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यामुळे सुपरवुमनच्या इमेजमध्ये आजची स्त्री अडकली आहे असं म्हणणं चूक आहे.

स्त्रियांनी अधिकाधिक संख्येनं राजकारणात येण्याची गरज आमदार नीलम गोऱ्हे यांनी व्यक्त केली. त्यांच्या मतानुसार स्त्रियांनी स्वत:चं अस्तित्त्व कमावलं आहे तसंच या स्वांतत्र्याबरोबर मनाची अस्वस्थता ही कमावली आहे. आज भगिनीभाव हरवत चाललेला आहे, त्याचप्रमाणे जगण्याची संधी एका बाजूला गमावत चालली आहे. आपल्याकडे स्त्रियांसाठी कायदे आहेत, पण त्याची अंमलबजावणी होत नाही. राजकीय इच्छाशक्तीमुळे असं घडतं.

स्त्री-स्वातंत्र्याबरोबर तंत्रज्ञानाचा दुरुपयोग हाही मुद्दा चर्चेला आला. याबद्दल नीलमताईंनी एक किस्सा सांगितला. सध्या इंटरनेटवर एका व्हिडीओला सर्वात जास्त हिट्स मिळताहेत. हा व्हिडिओ अमेरिकेतल्या एका नऊ वर्षांच्या मुलीचा आहे. आपली आंघोळ करताना व्हिडिओ शूट करून या मुलीनं तो विकला, आता उद्याही मी अशीच आंघोळ करणार आहे असं त्यात म्हटलंय. अशी प्रकरणं सध्या घडताहेत. त्यातून स्त्री देहाचा व्यापार करण्याचे प्रकार खूपच वाढीला लागले आहेत.

ड्रेसकोड हा सध्याचा सर्वात जास्त चर्चिला जाणारा मुद्दा. या परिसंवादात ड्रेसकोडविषयीही बरीच चर्चा झाली. डॉ. नीलम गोऱ्हे म्हणाल्या, की ड्रेसकोड हा असतोच. पण कोणी कसे कपडे घालावेत याचा निर्णय समाज घेऊ शकत नाही. अमुक प्रकारचे कपडे घातले म्हणून स्त्रियांवर हल्ले, बलात्कार होतात असं नाही. कारण बुरखा घातलेलल्या स्त्रीवरही बलात्कारही होतात. त्यामुळे कपडे हे या मागचं कारण नाही, तर ही एक पुरुषी मानसिक विकृती आहे. ड्रेसकोडबद्दल बोलायचं झालं तर सभ्यतेच्या सीमा ओलांडल्या जाणार नाहीत इतकी काळजी घेतली जावी.

एकूणच स्त्रीला सक्षम बनवणं म्हणजे एक माणूस म्हणून तिला समाजात प्रतिष्ठा मिळवून देणं. आपल्या क्षमता ओळखून तिनं स्वत:चा विकास करावा असा सूर या परिसंवादाचा होता. कालची आणि आजची स्त्री यात खूप फरक आहे. आजच्या स्त्रीला आकांक्षापुढती गगन ठेंगणे आहे. या आकांक्षा पुऱ्या करताना तिचं माणूसपण झाकोळलं जाऊ नये, तिची संवेदनशीलता लोप पावू नये ही अपेक्षा!

**– प्रतिनिधी**
मैत्रेय परिवार

---

**A Short History of the World**
**- H. G. Wells,**
**Pelican Books, Penguin Books,**
**Harmondsworth. Middlesex, 1949.**

Page 178... there remains in Islam, this faith he (Muhammad) imposed upon the Arabs, much power and inspiration. One characteristic is its uncompromising monotheism... Another is its complete detachment from the sacrificial priest and the temple. It is an entirely prophetic religion... And a third element of strength lay in the insistence of Islam upon the perfeact brotherhood and quality before God of all believers... he (Caliph Abu Bakr) set himself simply and sanely to organise the subjugation of he whole world to Allah...

Page 180.... Egypt fell almost without resistance to the new conquerors, who, full of a fanatical belief in the sufficiency of the Koran, wiped out the restiges of the book-copying industry of the Alexandrian Library.

Modern India- Swami Vivekanand, Advait a Ashram, Almora, 1946

Page15... Under the Mussulman rule, the king himself was the supreme priest,... the paramount leader in all matters... To the Mussulman, the Jew or the the Christian is not an object of extreme detestation; they are, at the worst, men of little faith. But not so the Hindu. According to him the Hindu is idolatrous, the hateful kafir hence, in this life he deserves to be butchered; and in the next, enternal hell is in store for him.

...If the religious ardour of any king was little more uncommon, there would immediately follow arrangements for a great Yajna, by way of kafir- slaughter!

**– मुरलीधर जावडेकर**
म्हाडा एचआयजी बिल्डिंग १, ब्लॉक नं.९
संत तुकाराम मार्ग, पिंपरी, पुणे-४११०१८
मो. ९८९०१६९१५६

प्रिय,

विषयः 'जनसंवाद' दुसऱ्या त्रैमासिक सर्वसाधारण बैठकीचा अहवाल.

'जनसंवाद'ची स्थापनेनंतरची दुसरी सर्वसाधारण त्रैमासिक बैठक रविवार, नोव्हेंबर ८, २००९ रोजी पुणे येथील विद्यार्थी साहाय्यक समितीच्या सभागृहात पंधराएक सदस्यांच्या उपथ्स्तितीत संपन्न झाली; काही सदस्य 'जनसंवाद'च्या बैठकीस प्रथमच आले होते. नवीन सदस्य व इतरांच्या आपापसातील ओळखीने नेहमीप्रमाणे बैठकीस अनौपचारिकरित्या सुरुवात झाली. त्या परिचयात ओघानेच जनसंवादच्या उद्दिष्टांची व कामाची ओळख आणि सदस्य कतर असलेल्या 'जनसंवाद' व्यतिरिक्तच्या वैयक्तिक, सामाजिक कामांचा आढावा घेतला गेला.

दिवाळी विशेषांकांच्या माध्यमातून 'जनसंवाद' एक राज्यव्यापी स्पर्धा घेत आहे. प्रतिसादाचा दर्जा व संख्येची वृद्धी साधण्यासाठी 'जनसंवाद'ने घेतलेल्या विशेष प्रयत्नांची अध्यक्षांनी ओळख करून दिली. त्यानुसार, राज्यातील छापील माध्यमे-दैनिके, साप्ताहिके व पाक्षिके, विद्यापीठांचे कुलसचिव आणि प्रशासनातील जिल्हा पातळीवरील सर्व माहिती आणि जनसंपर्क अधिकाऱ्यांकडे अध्यक्षांनी प्रसिद्धी पत्रके पाठवली आहेत.

दरम्यान, आत्तापर्यंत देणगीरूपाने 'जनसंवाद'कडे पस्तीसेक हजार रुपये जमा व चाळीस-बेचाळीस हजारांचा खर्च झाल्याचे सांगून अध्यक्षांनी सदस्यांना व संपर्क साधलेल्या आणि 'जनसंवाद'च्या विचारांबाबत सहानुभूती असलेल्या सर्व व्यक्तींना 'जनसंवाद'ला सढळ हाताने आर्थिक मदत करावी असे आवाहन केले.

'जनसंवाद'चा पुढील कार्यक्रम ठरवण्यासाठी अध्यक्षांनी उपस्थितांत वाटलेल्या टिपणाची प्रत सोबत जोडली आहे. औपचारिक व शास्त्रोक्त समाजशिक्षणाबाबतचे 'जनसंवाद'चे उद्दिष्ट हे शालेय शिक्षणातून उद्याच्या मूल्याधिष्ठित पिढ्या घडवण्याचे आहे; हा पर्याय शासन-प्रशासनाकडून देशभरात अंमलात आणण्यासाठी 'जनसंवाद' प्रयत्न करणार आहे. उपक्रम सुरू करण्यापूर्वी कार्यक्रम सफल होऊन उद्दिष्ट साधण्याची शक्यता शास्त्रोक्त पद्धतीने संबंधित विषयांच्या पंडितांकडून तपासणे गरजेचे आहे. प्रस्तुत टीपण मानव्य विज्ञान (ह्यूमॅनिटीज) विषयाच्या राज्यातील व्यावसायिकांचा व विविध विषयांतील निष्णात व्यक्तींचा एक परिसंवाद योजण्याचा ठराव मांडते.

ठरावावर प्रदीर्घ चर्चा झाली व त्यातून परिसंवाद योजण्याच्या विषयासंबंधात बरेच मुद्दे नोंदवले गेले. ह्या संबंधात 'जनसंवाद'च्या विचारांशी साम्य असलेल्या संस्थांशी नेटवर्क साधावे ही एक विशेष सूचना करण्यात आली. कुमार सप्तर्षींच्या विनंतीनुसार राजेंद्र माहुलकरांनी तसे प्रयत्न करण्याची जबाबदारी घेतली.

भोजनोत्तराच्या सत्रात ठराव संमत झाला व विषयाशी संबंधित व्यक्तींची एक परिसंवाद समिती नियुक्त करण्याचे ठरले. परिसंवादाची माहिती थोडक्यात व्यक्त करणारे इंग्रजीतील निवेदन उपरोक्त टीपणाच्या मागे दिले आहे. पुढील त्रैमासिक बैठकीची तारीख ठरल्यानंतर समारोप करताना अध्यक्षांनी उपस्थितांचे आभार मानले.

# जनसंवाद

**'जनसंवाद'चे कार्यक्रम**

गेल्या शतकात तीन सामाजिक, सांस्कृतिक चळवळी विशेष यशस्वी झाल्याचे भारतात दिसून येते. त्या चळवळी यशस्वी झाल्या असे म्हणण्यासाठी मुख्य लक्षणे अशी आहेतः

चळवळीची देशव्याप्तता आणि संबंधित क्षेत्रातील बहुसंख्यांचा चळवळीत झालेला समावेश,

संबंधितांना लाभलेले दृश्य स्वरूपातील फायदे, आणि

चळवळीची सातत्याता.

त्या तीन यशस्वी चळवळी आहेतः

स्त्री हक्कसंवर्धन व महिलाविकास,

अस्पृश्यता निवारण व दलितविकास, आणि

कामगार हितसंवर्धन व कामगारविकास.

ह्या चळवळींच्या यशाची प्रमुख कारणे आहेत -

संबंधित बाबीतील शासनाची भूमिका; सर्वसाधारणतः अनुकूल, किमान ती विरोधी नसणे,

संबंधित क्षेत्रातील व्यक्तींचे साधलेले प्रबोधन व त्यातून निर्माण झालेली जागरुकता आणि तत्कालिन वा निर्माण होणाऱ्या परिस्थितीत संबंधित क्षेत्रातील व्यक्तींचे स्वतःच्या विकासाचे प्रयत्न; प्रसंगी गरजेचा त्याग करण्याची, कष्ट घेण्याची व संघर्षाची तयारी, आणि

संबंधित गटाला पूर्णतया डावलणे उर्वरित समाजाला न परवडणारे- म्हणजेच परस्परावलंबनाची भावना स्पष्ट झालेल्या लोकांच्या-एकमेकांच्या पूरक गरजा.

प्रत्येक चळवळीत, आजवर

साधलेल्या प्रगतीचे मोजमाप बघणाऱ्याच्या दृष्टिकोनानुसार कमी-जास्त ठरेल. परंतु, शंभर वर्षांपूर्वीच्या भारतातील परिस्थितीची त्या त्या क्षेत्रातील सर्वसाधारण घटकांच्या आजच्या परिस्थितीशी तुलना करता चळवळी यशस्वी झाल्या, हे नमूद करावे लागेल; आणि महत्त्वाचे म्हणजे, त्या तया समाजातील घटकांची वाटचाल आजवर प्रगतीकडेच होत राहिलेली आहे व होत राहणार; चक्र उलट्या दिशेने फिरण्याला आता वावच उरलेला नाही.

ह्या चळवळींच्या उपरोल्लेखित विवेचनावरून एक लक्षात येईल की कोणत्याही विकासाभिमुख चुळवळीला शासकीय विरोध नसावा. चळवळीचे नियोजन करताना शासनाला बरोबर घेऊन जाणे म्हणूनच गरजेचे ठरते व त्यासाठी, गरज पडल्यास, किमान सामाजिक व राजकीय दबाव शासनावर पडणे/पाडणे आवश्यक ठरते.

'जनसंवाद'चे मूळ उद्दिष्ट आहे ते एकविसाव्या शतकातील 'लोकशाही'तील भारतीय नागरिकांना विकसित व सुखाच्या जीवनासाठी गरजेची असलेली सामाजिक मानसिकता परिर्वतनातून साधणे, लोकशाहीतील स्वतःच्या हक्कांचे व जबाबदाऱ्यांचे भान समाजाला आणून देणे आणि सामाजिक बांधिलकीच्या नितांत गरजेची जाण करून देणे. विकासासाठी समाजाने स्वतः जागरुक राहून प्रयत्नशील राहण्यासाठीचे प्रबोधन सुद्धा तितकेच महत्त्वाचे.

'जनसंवाद' चळवळीच्या कार्यक्रमांचे नियोजन करताना, उद्दिष्ट साधण्याकरिता, पाच व्यवस्थांचा विचार करावा लागेल. 'जनसंवाद'च्या कार्यक्रमांच्या निवडीकरता त्या पाच व्यवस्थांचा विचार करताना खालील गोष्टी लक्षात येतात.

१. शासन-प्रशासन - उपरोक्त उद्दिष्ट साधण्यासाठी कोणतेही नवे कायदे वा कायद्यांतील बदल साधण्याची विशेष गरज नाही. म्हणूनच, शासनाकडून प्रत्यक्ष विरोध होण्याची संभावना मुळातच उपस्थित होत नाही. लोकशाहीत, शासन-प्रशासन राबवणाऱ्या व्यक्ती त्या समाजातूनच आलेल्या असतात, म्हणजेच बहुतांश समाजाला जर 'जनसंवाद' चळवळीची गरज पटली, उद्दिष्टे समाधानकारक वाटली तर शासन-प्रशासनाच्या, पुढे-मागे होऊ शकणाऱ्या, विरोधाची धार निश्चितच बोथट होईल.

२. समाज - 'जनसंवाद' दिवाळी अंकातील स्पर्धेच्या माध्यमातून तालुक्या-तालुक्यांपर्यंत पोचण्याचा प्रयत्न करत आहे. जोडीला, निवडलेल्या उद्दिष्टांच्या विषयांवर गावोगावी सुयोग्य चर्चा घडवून आणण्यासाठी 'जनसंवाद-कट्ट्या'चा प्रकल्प चळवळीने हाती घेतला आहे.

३. माध्यमे - तिसरी महत्त्वाची व्यवस्था आहे ती माध्यमे. उपरोक्त स्पर्धेद्वारा राज्यातील मासिके, साप्ताहिके, दैनिकांपर्यंत जनसंवादच्या अस्तित्वाची ओळख पोचली आहे; बऱ्याच जणांकडून साहाय्य होण्यास सुद्धा सुरुवात झाली आहे. हळूहळू, दृकश्राव्य माध्यमांचा समावेश साधण्याच्या दृष्टिकोनातून प्रस्तुत राज्यव्यापी स्पर्धेतील विजेत्यांना द्यावयाच्या पारितोषिकांच्या वितरणसमारंभावर विशेष लक्ष केंद्रित केले पाहिजे व त्यासाठीच्या प्रयत्नांचा आजच्या बैठकीत विचार व्हावा.

४. संबंधित क्षेत्र

गरजेच्या सामाजिक परिवर्तनासाठी उपाययोजना म्हणून 'जनसंवाद'चे दूरगामी उद्दिष्ट आहे ते उद्याच्या पिढ्यांची वृत्ती घडवण्याचे-प्रौढांच्या परिवर्तनापेक्षा, वृत्तीबदलापेक्षा संस्कारक्षम विद्यार्थ्यांची वृत्ती घडवण्याचा प्रयत्न त्यामानाने सोपा ठरावा. 'जनसंवाद'ने लक्ष्य केलेला प्रकल्प आहे तो शास्त्रोक्त आणि औपचारिक समाजशिक्षणाचा; देशभरातील शाळा-कॉलेजातून दिल्या जाणाऱ्या पहिली ते बारावी ह्या शालेय-शिक्षणात योग्य तो समाजशिक्षणाचा अभ्यासक्रम शासनाकडून समाविष्ट करून घेऊन तो अनिवार्य म्हणून घोषित करण्याचा. शास्त्रोक्त आणि औपचारिक समाजशिक्षणाचा पर्याय विकसित करून त्याची अंमलबजावणी शासनाकडून होण्याकरिताच मुख्य प्रयत्न व्हायला पाहिजेत; त्याकरिता पुढाकार घेतला पाहिजे तो शिक्षणक्षेत्राकडून-विशेषतः मानव्यविज्ञानाच्या (ह्युमॅनिटीज) शाखांकडून.

आजच्या बैठकीत मी ह्या संदर्भात एक राज्यव्यापी परिसंवाद 'जनसंवाद'ने आयोजित करावा, असा प्रस्ताव मांडणार आहे.

५. न्यायव्यवस्था - शेवटची व महत्त्वाची व्यवस्था म्हणजे देशाच्या न्याय व विधी क्षेत्राशी जोडलेल्या व्यक्ती. जनसंवादच्या पुढील कार्यक्रमांच्या नियोजनात ह्या गरजेच्या व्यवस्थेला अनुकूल करून घेण्याकरिता विचार झाला पाहिजे.


॥ग्रंथाली॥



**फुलाला सुगंध मातीचा**

**डॉ. अनुराधा हरकरे**
**डॉ. अंजली कुलकर्णी**

मूल्य १५० रुपये
सवलतीत ९० रुपये